सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ७९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १६ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## अमरावती पायलट ट्रेनिंग स्कूलमुळे जगाच्या नकाशावर

### केंद्राने पहिले विमान दिले, त्याच विमानातून आम्ही आलो – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आमरावतीच्या दौऱ्यावर असून येथे विमानतळ लोकार्पण सोहळा पार पडला. यावेळी फडणवीस यांनी भाषणात बोलताना म्हणाले की, अमरावती येथे पायलट ट्रेनिंग स्कूल सुरू होणार असून यामुळे अमरावती जगाच्या नकाशावर येणार आहे, असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. तसेच केंद्राने पहिले विमान आम्हाला दिले, त्याच विमानातून आम्ही आलो आहोत, असेही फडणवीस म्हणाले.महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी अमरावती विमानतळाचे उद्घाटन केले. यावेळी सोबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री गिरीश महाजन, उद्घाटन समारंभाला उपस्थित होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज या एअरपोर्टचे काम आपण पूर्ण केले. २०१९ साली काम सुरू केले होते. मोदींच्या सरकारमध्ये प्रयत्न करून महाराष्ट्र आणि केंद्र सरकारने काम हाती घेतले. धावपट्टीचे विस्तारीकरण केले, नवनीत राणा सोबत होत्या. त्यानंतर काही कारणाने बंद पडले होते. केंद्र सरकारशी संबंधित काम सुरू होते. राज्य सरकारशी संबंधित काम संथगतीने होते. पण शिंदे सरकार आल्यानंतर वेगाने काम सुरू झाले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्र सरकारने एअरपोर्टला पहिले विमान दिले. या विमानात बसून आम्ही आलो. अमरावती येथे सुरू झालेले हे विमानतळ आपल्याला अजून वाढवायचे आहे. जवळपास ३ हजार मीटर पर्यंत धावपट्टी बनवावी लागेल. ज्यामुळे अमरावतीच्या विमानतळावर कुठलेही विमान उतरू शकेल. यामुळे विदर्भात दुसरे मोठे विमानतळ उभे राहण्यास मदत होणार आहे. जिथे विमानतळ तिथे उद्योजक जातात, त्यामुळे विमानतळ महत्त्वाचे आहे.

**साऊथ ईस्ट एशियामधली सर्वात मोठी पायलट ट्रेनिंग स्कूल**

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणले, अमरावती येथे पायलट ट्रेनिंग स्कूल आल्यामुळे मोठ्या प्रमाणात इकनॉमिक ॲक्टिविटी सुरू होत आहे, अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. याचे वेगवेगळे फायदे आपल्याला मिळणार आहेत. रोजगार निर्मिती होणार आहे. म्हणून मला असे वाटते की मोदी सरकारच्या कार्यकाळात मिळालेली ही सर्वात मोठी भेट आहे. अमरावती हे केवळ एक विमानतळ म्हणून ओळखले जाणार नाही, तर जगाच्या पाठीवर साऊथ ईस्ट एशियामधली सर्वात मोठी पायलट ट्रेनिंग स्कूल आपल्या अमरावतीमध्ये सुरू होत आहे. अशी ओळख अमरावतीला मिळणार आहे.

**सात लाख कोटींचे करार विदर्भातील**

देवेंद्र फडणवीस म्हणले, मोदींना सात टेक्स्टाईल पार्क तयार करायचा ठरवले होते. त्यातील एक पार्क अमरावतीला देण्याचे मोदींनी मान्य केले. आता तो सुरू होतोय, २ लाख लोकांना रोजगार मिळणार आहे. आपला कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. समृद्धी महामार्गामुळे मुंबईशी जोडलो गेलो आहोत. राज्यात नवीन पोर्ट झाला. वाढवण बंदरलाही आपण जोड देत आहोत. त्यामुळे विदर्भ जेएनपीटीशी आणि वाढवण बंदरशीही जोडला जाणार आहे. त्यामुळे पोर्ट लेअर इंडस्ट्री मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. सात लाख कोटींचे करार विदर्भातील असल्याचे हि ते यावेळी म्हणाले

## आता अमरावती ते मुंबई फक्त दोन तासांत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विमानतळाचे लोकार्पण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

अमरावतीकरांसाठी एक मोठं गिफ्ट देण्यात आलं आहे. आज अमरावतीमध्ये विमानतळाचा लोकार्पण सोहळा पार पडला. अमरावती विमानतळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज उद्घाटन करण्यात आलं. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे देखील हजर होते. अमरावती विमानतळाची निर्मिती १९९२ मध्ये झाली होती. १९९२ मध्ये विमानतळ फक्त व्हीआयपी व्यक्तींसाठी सुरू होतं. मात्र आता सर्वसामान्य लोकांना विमानतळावरून प्रवास करता येणार आहे.

अमरावती विमानतळाच्या धावपट्टीची लांबी १८५० मीटर असून ४५ मीटर रुंद आहे.आशियातील सर्वात मोठं एअर इंडियाचं वैमानिक प्रशिक्षण केंद्र इथे उभारलं जाणार आहे.विमानतळावर एकाच वेळी ATR/72 सीटर अशी दोन विमान पार्किंग होऊ शकतात.ऑक्टोबर महिन्यात विमानतळावरून नाईट लँडिंग सुरू होणार आहे.




**अमरावती विमानतळाचे फायदे काय?**

१. अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वाशीम मधील नागरिकांना मुंबईत लवकर पोहोचता येईल.

२. मुंबईला जाण्यासाठी याआधी अमरावतीहून नागपुरात जावे लागायचे.

३. विमानतळ उड्डाण योजनेअंतर्गत असल्याने तिकीट सर्वसामान्यांना परवडणार असणार.

४. अमरावतीहून मुंबईला जाण्यासाठी रेल्वेने १२ तास लागत होते, विमानाने पाऊणे दोन तास लागणार.

५. आठवड्यातून ३ दिवस म्हणजे सोमवारी, बुधवारी आणि शुक्रवारी अमरावतीहून मुंबई हे विमान जाणार.

६. विमानसेवेमुळे अमरावतीच्या दळणवळणाचा चांगला विकास होणार.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ३० एप्रिलला आंबा महोत्सवाचे उद्घाटन

### कोकणातील देवगड व रत्नागिरीतील हापूस आंबा महाराष्ट्रात व देशभरात प्रसिद्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नवी दिल्ली**

दिल्लीच्या महाराष्ट्र सदनात आंबा महोत्सवाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते येत्या ३० एप्रिल रोजी सायंकाळी ६ संपन्न होणार आहे. मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे शिंदे सेनेचे खासदार रविंद्र वायकर यांच्या संकल्पनेतून महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवाला केंद्रीय मंत्री, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री यांच्या बरोबरच देशाच्या विविध राज्यातील खासदार व आमदारही उपस्थित राहणार आहेत. ३० एप्रिल ते १ मे (महाराष्ट्र दिन) पर्यंत आंबा महोत्सव येथे संपन्न होणार आहे. या महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे ही आयोजन करण्यात येणार आहे.




कोकणातील देवगड व रत्नागिरीतील हापूस आंबा महाराष्ट्रात व देशभरात खूपच प्रसिद्ध आहे. कोकणातील शेतकऱ्यांना विविध राज्यांमध्ये थेट बाजारपेठ उपलब्ध व्हावी, त्यांना जास्तीत जास्त नफा मिळावा, आंब्याच्या निर्यातीला अधिक चालना मिळावी, या उदात्त हेतूने दिल्लीच्या महाराष्ट्र सदनात या दोन दिवसीय आंबा महोत्सवाचे आयोजन केले आहे. या महोत्सवामुळे ग्रामीण भागातील उद्योजकांना मोठ्या प्रमाणात बाजारपेठ उपलब्ध होणार असल्याची माहिती खासदार वायकर यांनी लोकमतला दिली.या महोत्सवाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभ हस्ते व्हावे यासाठी त्यांची भेट घेतली होती. प्रत्येक राज्यातील जिल्ह्यात उत्पादित होणाऱ्या फळांना जास्तीत जास्त मोठ्या प्रमाणात बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी राज्यांनी प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे, असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भेटी दरम्यान व्यक्त केले होते अशी माहिती त्यांनी दिली.

दिल्लीतील जास्तीत जास्त आंबा प्रेमीनी या महोत्सवाला भेट देऊन कोकणातील आंबा, अन्य उत्पादकांना तसेच शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन खासदार रविंद्र वायकर यांनी केले आहे.

## करुणानिधी, जयललितांनंतर आता बाळासाहेब ठाकरेंचा पुन्हा आवाज घुमणार; ‘एआय’ भाषण सादर होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६मुंबई**

एआय म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेचा अन्य क्षेत्राप्रमाणे राजकारणात वापर सुरू असून, गेल्या वर्षी दिवंगत करुणानिधी आणि जयललिता यांच्या नेत्यांच्या आवाजातील भाषणानंतर आता शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या आवाजात सद्य:स्थितीवर त्यांचे भाषण सादर होणार आहे. यानिमित्ताने निष्ठावान



शिवसैनिकांना साद घालण्याबरोबरच या पाखरांनो परत फिरा असे अन्यत्र गेलेल्या शिवसैनिकांना आवाहन करण्यात येणार असल्याचे वृत्त आहे.

नाशिकमध्ये होणाऱ्या निर्धार मेळाव्यात शिवसेना प्रमुखांचे एआयमधील भाषण हे आकर्षण करणार आहे. यापूर्वी दूरदृश्यप्रणालीद्वारे सभा, उद्घाटने झाले आहेत. मात्र, एआयच्या माध्यमातून भाषणांचा दौरही सुरू झाला आहे. गेल्या वर्षी लोकसभा निवडणुकीच्या पूर्वी म्हणजे फेब्रुवारी महिन्यात डीएमकेने एका मेळाव्यात दिवंगत नेते करुणानिधी यांचे भाषण ऐकवले होते, तर एडीएमकेने दिवंगत मुख्यमंत्री जयललिता यांच्या आवाजाची ध्वनिफीत तयार केली होती, ती मतदारांपर्यंत पोहोचवली होती.

महाराष्ट्रात मात्र शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या आवाजात भाषणाचा पहिलाच प्रयोग होत असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. यात शिवसेनाप्रमुख नक्की काय बोलू शकतील याविषयी तर्क सुरू असून अनोख्या प्रयोगाबद्दल उद्धवसेनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये ही उत्साहाचे वातावरण आहे.

## भारताच्या सरन्यायाधीशपदी पुन्हा एकदा महाराष्ट्राचे सुपुत्र; संजय खन्ना यांनी केली बी. आर. गवई यांची शिफारस!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नवी दिल्ली**

भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी बुधवारी केंद्रीय कायदा मंत्रालयाकडे न्यायमूर्ती बी. आर गवई यांची पुढील सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस केली. १० नोव्हेंबर रोजी निवृत्त झालेले माजी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या जागी न्यायमूर्ती खन्ना यांची ११ नोव्हेंबर रोजी सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली. आता बी. आर. गवई यांची



नियुक्ती करण्यात येणार आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.खन्ना हे सहा महिन्यांच्या अल्प कालावधीनंतर १३ मे २०२५ रोजी निवृत्त होणार आहेत.

## २३ तारखेला मनोज जरांगे मुंबईत, मुख्यमंत्री फडणवीसांची भेट घेणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मुंबई**

येत्या २३ तारखेला मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील त्यांच्या मागण्यांसंदर्भात मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार आहे, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली आहे. उदय सामंत आणि खासदार संदिपान भुमरे यांनी आज मनोज जरांगे पाटील यांची अचानक भेट घेतली. पैठण फाटा येथील छत्रपती भवन येथे जरांगे यांच्यासोबत सामंत यांनी चर्चा केली आहे. मागच्या दोन वर्षांपासून जरांगे पाटील मराठा आरक्षणासाठी आंदोलन करत आहेत.

मागचं उपोषण सोडताना सरकारनं जरांगे यांना आश्वासन दिलं होतं. आता आश्वासनाची मुदत संपत आहे. त्याआधी सामंत यांनी जरांगे यांच्याशी चर्चा केली. येत्या २३ तारखेला मुंबईत मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन जरांगे यांच्या मागण्यासंर्दभात



चर्चा करणार असल्याचं सामंत यांनी म्हटलंय.

दरम्यान कुणबी नोंदी असूनही प्रमाणपत्र न देणाऱ्यांना निलंबित करावे, असं जरांगे यांनी म्हटलंय. सरकारला दिलेली मुदत ३० एप्रिल रोजी संपत आहे. त्यामुळं सरकारनं मागण्या मंजूर केल्या. राज्यव्यापी बैठक घेऊन मुंबईत आंदोलन करू, असा इशारा देखील जरांगे यांनी सरकारला दिला आहे.दरम्यान एकनाथ शिंदे नाराज असल्याचं संजय राऊत यांनी म्हटलं होतं. त्यावर उदय सामंत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. राजकारणाच्या पलीकडे जाऊन आम्ही जाहीरपणे भेटलो आहे. संजय राऊतांनी शिंदेंच्या कामाचं प्रमाणपत्र देण्याची गरज नाही. त्यांच्याकडे असलेले दहा-पंधरा आमदार त्यांनी व्यवस्थित सांभाळावे. त्यांच्यावर टीका करून आम्हाला संजय राऊत यांना मोठं करायचं नाही, असं सामंत यांनी म्हटलं आहे.

## सगळे इतिहासकार शरद पवारांच्या जवळचे : फावल्या वेळेत त्यांनी नवा इतिहास लिहावा - गोपीचंद पडळकर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६पुणे**

सगळे इतिहासकार शरद पवारांच्या जवळचे आहेत, तसेच शरद पवारांनी फावल्या वेळेत नवा इतिहास लिहावा, अशी टीका भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी केली आहे. पुण्यात प्रसारमाध्यमांशी ते बोलत होते. तसेच किल्ले रायगडवरील वाघ्या कुत्र्याच्या समाधीची सुरक्षा वाढवली पाहिजे, २० पोलिस सुरक्षेसाठी तैनात केले पाहिजेत. वाघ्या कुत्र्याच्या समाधीबाबत राज्य सरकारने ठाम भूमिका घ्यावी, असेही गोपीचंद पडळकर म्हणाले.



गोपीचंद पडळकर म्हणाले, उदयनराजे यांच्याबद्दल नितांत आदर आहे, हे खुसपट ब्रिगेडने काढले आहेत. शरद पवारांना जवळच्या असलेल्या या संघटना विषय बाहेर काढतात. सगळे इतिहासकार पवार साहेबांच्या जवळचे आहेत. शरद पवारांनी फावल्या वेळेत नवा इतिहास लिहावा. एकदाच नवीन इतिहास लिहा, म्हणजे पुढच्या पिढ्यांना परत इतिहास लिहण्याची गरज नाही, असा खोचक टोलाही पडळकर यांनी लगावला आहे.

पुढे बोलताना गोपीचंद पडळकर यांनी सध्या चर्चेत असलेल्या 'फुले' या महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनावर आधारित चित्रपटावर देखील परतिक्रिया दिली आहे. गोपीचंद पडळकर म्हणाले, जात बघून इतिहास काढायचा. नवीन इतिहासकार जागे झाले आहेत. नवीन इतिहासकार लाँच झाले आहेत. ते इतिहासकार २५० रुपयांचे जॅकेट घालून फिरत असतात.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांच्या तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे सध्या आंदोलन सुरू आहे. यावर देखील पडळकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पडळकर म्हणाले, एमपीएससीमध्ये अनेक पुढारी तयार झाले आहेत. विद्यार्थ्यांनी मला जर त्यांचा विषय दिला तर मुख्यमंत्री यांच्याशी मी बोलेन. राज्य सरकारने स्पर्धा परीक्षा क्लासेसबद्दल मुद्दा गांभीर्याने घेतला पाहिजे.असेही पडळकर म्हणालेत.

## संपादकीय ......

# भाजपचे 'ऑपरेशन तामिळनाडू'

भाजपने अण्णा द्रमुकशी युती करत तामिळनाडू विधानसभा निवडणुकीची जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. द्रमुकची सत्ता उखडून फेकून देण्याचा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे, तर केंद्राच्या धोरणांना थेट विरोध करत द्रमुकने भाजपविरोधी आघाडी उघडल्याने राजकीय संघर्ष उफाळणार आहे.

भाजपसोबतची युती दोनच वर्षांपूर्वी तोडणार्या आणि आम्ही भविष्यात भाजपसोबत काम करणार नाही, अशी स्पष्ट भूमिका घेणार्या अण्णा द्रमुक पक्षाशी नव्याने बाशिंग बांधत भाजपने तामिळनाडूत दक्षिण विजयासाठी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. मुख्यमंत्री स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील द्रमुक सरकारला हटवण्याचा आणि दक्षिणेतील राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या राज्यात कमळ फुलवण्याचा अजेंडा भाजपने हाती घेतला असून अण्णा द्रमुकशी समझोता करत निवडणूक आघाडीवर पहिल्या टप्प्यातील मोठे यश मिळवले आहे. तामिळनाडूत अण्णा द्रमुक आणि भाजपचे संबंध आजवर नरम–गरम राहिले आहेत. भाजपचे हिंदुत्ववादाचे आणि अण्णा द्रमुकचे तामिळींचा कळवळा असणारे, अल्पसंख्याकांना सोबत घेण्याचे सर्वसमावेशक राजकारण यावरूनच या पक्षांतील युती फिसकटली होती. अण्णा द्रमुकचे नेतृत्व जयललिता यांच्याकडे जोपर्यंत होते तोपर्यंत त्यांच्याशी युती करून भाजपने या राज्यात बर्यापैकी हातपाय पसरले.

विशेषत: १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत चांगले यश मिळवल्याने अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली एनडीएचे सरकार केंद्रात स्थापन करण्यात जयललिता यांनी महत्त्वाची भूमिका बजावली खरी; पण पुढच्याच वर्षी भाजपने मागण्या नाकारल्याचे कारण पुढे करीत त्यांनी सरकारचा पाठिंबा मागे घेतल्याने ते कोसळले. पुढच्या दोन निवडणुकांत हे दोन्ही पक्ष एकत्र येऊ शकले नाहीत; मात्र २०१९ च्या निवडणुकीत ते पुन्हा एक झाले. गेल्या २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत या आघाडीने द्रमुकशी चांगली लढत देऊनही सत्ता स्थापन करता आली नाही. त्यानंतर मात्र दोन्ही पक्षांतील दरी वाढत गेली. राज्यात पक्ष विस्ताराची मोठी जबाबदारी असलेले प्रदेशाध्यक्ष अण्णामलाई यांनी आक्रमक भूमिका घेताना अण्णा द्रमुक सरकारच्या काळातील काही निर्णयांवर विरोधाची भूमिका घेतली. जयललिता यांच्यावर टीका केली. स्थानिक अल्पसंख्याक मतपेढी हरवण्याच्या भीतीपोटी दोन वर्षांपूर्वी अण्णा द्रमुकने भाजपशी युती तोडली. आता नव्याने साकारलेल्या युतीला ही पार्श्वभूमी आहे. भाजपने जुन्या मतभेदांवर पडदा टाकला आणि नव्या दमाने 'ऑपरेशन तामिळनाडू' सुरू केले आहे. ते करताना अण्णा द्रमुकच्या दबावापुढे झुकत युतीत अडथळा ठरणारे प्रदेशाध्यक्ष अण्णामलाई यांना हटवण्यात आले. दक्षिणेशी जोडण्याचा भक्कम पूल म्हणून भाजप या युतीकडे पाहते. अर्थात, पक्षाकडे स्वबळाची ताकद नाही आणि दुसरा पर्यायही नाही, हेही वास्तव! या नव्या युतीचा मुख्य स्पर्धक आहे तो सत्ताधारी द्रमुक. त्याच्याशी लढण्यासाठी अण्णा द्रमुकलाही भाजपसारख्या बलाढ्य पक्षाची साथ हवी होती. लोकसभा निवडणुकीत या दोन्ही पक्षांचा दारूण पराभव झाला होता. द्रमुकच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीने सर्व ३९ जागा, तर काँग्रेसने ९ जागा मिळवल्या होत्या. विधानसभेतही सत्तारूढ द्रमुक आघाडीकडे १५९ आमदारांचे स्पष्ट बहुमत (एकूण जागा २३४) आहे, तर विरोधी एनडीएकडे ७५ जागा आहेत. सत्ताधारी प्रमुख पक्षांपैकी द्रमुक १३२, काँग्रेस १७, विरोधी अण्णा द्रमुक ६२, भाजप ४ हे बलाबल लक्षात घेता सत्तेसाठी किमान ११८ जागा खेचून आणण्याची ही लढाई भाजप युतीसाठी वाटते तितकी सोपी नाही. त्याचमुळे झालेली चूक दुरुस्त करण्याचा प्रयत्न भाजपने चालवला आहे. भाजपचा हिंदुत्ववादी चेहरा, चौफेर विकासाचा दावा, उत्तर तामिळनाडूच्या भागात पसरलेला नवमतदार, ग्रामीण भागावर असलेली अण्णा द्रमुक पक्षाची मजबूत पकड याची गोळाबेरीज करण्याची रणनीती भाजपने आखलेली दिसते. पक्षाची भिस्त अण्णा द्रमुकवरच असल्याने त्या पक्ष नेत्यांच्या तालावर नाचण्याशिवाय पक्षासमोर पर्याय नाही. भाजपचा प्रदेशाध्यक्ष बदलण्यास भाग पाडून आणि नंतर निवडणुकीची सर्व सूत्रे स्वत:कडे घेऊन अण्णा द्रमुकने आधीच आपला मार्ग प्रशस्त करून घेतला आहे. आता खरा प्रश्न आहे तो, हा मेळ घालणार कसा? सत्ताधारी द्रमुकने तामिळींच्या भावनांना हात घालत हिंदी भाषेला विरोधाचा आणि अस्मितेचा मुद्दा पुढे केला आहे. अण्णा द्रमुकची भाजपशी युतीमागील भूमिका राष्ट्राच्या मुख्य प्रवाहाशी आणि त्यायोगे केंद्रातील सत्तेशी जोडले जाण्याची आहे. भाजपला डबल इंजिन सरकारचा प्रयोग इथेही करायचा आहे. मुख्य इंजिन अण्णा द्रमुकचेच राहणार यात वाद नाही.

# डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाला नेमका विरोध कोणाचा?




आज १६ एप्रिल अमरावती विमानतळावरून मुंबई अमरावती मुंबई विमानसेवेचा शुभारंभ करण्यात आला. या उदघाटन समारंभाला उपस्थित राहण्याविषयी खासदार बळवंतराव वानखडे यांना एलायंस एअरने जे पत्र पाठविले त्यात विमानतळाचा उल्लेख 'डॉ. पंजाबराव देशमुख अमरावती विमानतळ असा करण्यात आला. हे निमंत्रण सोशल मिडीयावर सर्वत्र प्रसारित झाले आणि सर्व अमरावतीकरांना एकच आनंद झाला. उद्घाटनापूर्वी विमानतळाला डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव मिळाल्याने अमरावतीकर जनतेची अनेक दिवसाची मागणी पूर्ण झाली, या आनंदात अमरावतीकर असतानाच सरकारी चक्रे फिरली आणि विमानतळ विकास प्राधिकरणाने या नावावर आक्षेप नोंदविला. त्यानंतर एलायंस एअरने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. फडणवीस यांना पत्र पाठवून आपण गुगल सर्च वरून हे नाव घेतल्याचे सांगून सुधारित निमंत्रण पाठवीत असल्याचे त्यांना कळविले. आणि अमरावतीकरांना झालेला आनंद लगेच हिरावून घेतला. त्यामुळे डॉ. पंजाबराव देशमुख यांचा नावाला नेमका कोणाचा विरोध आहे? हा प्रश्न उपस्थित झाला आहे.अमरावती विमानतळाला 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात यावे, अशी अमरावतीकरांची अनेक वर्षांपासून मागणी आहे. सप्टेंबर २०१९ मध्ये या संदर्भात अमरावती महानगर पालिकेने एकमुखाने ठराव पारित करून तसे निवेदन सरकारला पाठविले होते. अमरावती जिल्हा परिषद आणि जिल्ह्यातील पंचायत समित्यांनीही काही वर्षांपूर्वीच हा ठराव पारित केला. अनेक सामाजिक व राजकीय संस्था आणि संघटनांनी देखील वेळोवेळी ही मागणी उचलून धरली. जेंव्हा जेंव्हा विमानतळाच्या पुढील कामाला सुरुवात झाली तेंव्हा तेंव्हा ही मागणी वृत्तपत्रातून उमटत होती. अमरावती जिल्ह्याचे माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी या मागणीचा वारंवार पाठपुरावा केला. भाजपचे धामणगाव रेल्वे मतदार संघाचे आमदार प्रतापदादा अडसड यांनी आमदार झाल्या झाल्या अमरावती विमानतळाला डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी केली.अमरावती विमानतळ हे बेलोरा येथे म्हणजे डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव असलेल्या पापळ पासून अवघ्या २२ किलोमीटर अंतरावर असून दोन्ही गावे नांदगाव खंडेश्वर तालुक्यात येतात. त्यामुळेही त्यांचे नाव विमानतळाला देणे अधिक संयुक्तिक आहे. असे असताना त्यांच्या नावाला विमानतळ विकास प्राधिकरणाने आक्षेप नोंदवावा, ही समस्त अमरावतीकरांना धक्का देणारी बाब आहे. निश्चित यामागे वेगळे राजकारण शिजत असून त्याची सुरुवात महिन्यापूर्वीच झाली आहे.



अमरावती विमानतळाला डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव द्यावे, अशी सर्व लोकप्रतिनिधी आणि जनता यांची मागणी असताना अचानक एक महिन्यापूर्वी कुठून तरी प्रज्ञाचक्षु संत गुलाबराव महाराज यांचे नाव पुढे करण्यात आले. प्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराज हे अमरावतीतील चांदूर बाजार तालुक्यातील माधान येथील तत्त्वज्ञानी संत महापुरुष. शेकडो ग्रंथांचे रचनाकार असलेले गुलाबराव महाराज देखील बहुजन समाजातील त्यामुळे त्यांचे नाव समोर केले तर कोणी विरोध करणार नाही, हे त्यांचे नाव समोर करणाऱ्या सुपीक डोक्याला माहित होते. झालेही तसेच कोणीही या नावाला विरोध दर्शविला नाही पण या विमानतळाला डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्याच्या मागणीने पुन्हा जोर धरला आणि सरकारची पंचाईत झाली. गुगल सर्चवर आधीच या विमानतळाचे 'डॉ. पंजाबराव देशमुख अमरावती विमानतळ' असे नामकरण झाले असून आणि मॅजिकब्रीक्स या वेबसाईटवर देखील अमरावती विमानतळाला हेच नाव देण्यात आले आहे.

अमरावती विमानतळाला प्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराज यांचे नाव देण्यात यावे, असे पिल्लू जेंव्हा समोर आले तेंव्हाच सरकारचा डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाला विरोध आहे, हे स्पष्ट झाले होते. आपल्या पंतप्रधानांना गुलाबराव महाराजांविषयी किती माहिती आहे?, हे माहित नाही परंतु नुकत्याच नागपूर दौऱ्यात माधव नेत्रालयाच्या विस्तारित इमारतीचे भूमिपूजन करताना त्यांनी आपल्या भाषणात गुलाबराव महाराज यांचा उल्लेख केला. रा.स्व. संघाचा आणि गुलाबराव महाराज यांचा काहीही संबंध नसताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यावर प्रकाश टाकताना मा. पंतप्रधान म्हणाले, गुलाबराव महाराज यांनी आपल्या अंतरदृष्टीतून अनेक ग्रंथ लिहिले, संघ हे एक संस्कार यज्ञ आहे, प्रत्येक स्वयंसेवकाला अशीच अंतरदृष्टी आणि बाह्यदृष्टी देण्याचे काम करते'.अमरावती विमानतळाला डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यास कोणाचा विरोध आहे?, हे सांगण्यासाठी इतके पुरेसे आहे.

डॉ. कुमार बोबडे, अमरावती
मो.९४२२८५६९४४

# हिरव्या चाऱ्यामध्ये पाणी असतं का? उन्हाळ्यात जनावरांना फायद्याचं, वाचा सविस्तर

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

दि.१६विदर्भ प्रजासत्ताक ६

उन्हाळ्यात, उष्णतेचा ताण आणि निर्जलीकरण यासारख्या मोठ्या समस्या जनावरांसाठी घातक ठरतात. उष्णतेच्या ताणामुळे जनावरांमध्ये पाण्याची कमतरता भासू लागते. आणि जेव्हा जनावरांमध्ये पाण्याची कमतरता असते. तेव्हा त्यांना डिहायड्रेशनची समस्या भेडसावू लागते.

उन्हाळ्यात जनावरांना किती पाणी प्यायला द्यावे, याचे एक निश्चित प्रमाण असले तरी, अनेक वेळा अज्ञानामुळे किंवा दुर्लक्षामुळे प्राण्यांना त्यांच्या गरजेनुसार पाणी मिळत नाही. अशा परिस्थितीत, जनावरांमधील पाण्याची कमतरता भरून काढण्याचे कसब हिरवा चाऱ्यामध्ये असते. ते कसे याबाबत नेमकं जाणून घेऊयात....

राष्ट्रीय पशुधन अभियानाच्या माध्यमातून उन्हाळ्यात जनावरांची काळजी याबाबत सल्ला दिला जात आहे. त्यापैकीच एक म्हणजे हिरवा चाऱ्याबाबत. एक किलो हिरव्या चाऱ्यामध्ये सरासरी तीन ते चार लिटर पाणी असते. जनावरांना पाणी देण्यात शेतकरी कमी पडला तर हिरव्या चाऱ्यातून ही कमतरता भरून निघते. फक्त शेतकऱ्यांनी हिरव्या चाऱ्याची तजवीज करणे आवश्यक ठरते.




गायी आणि म्हशींना पिण्यासाठी ३० ते ७० लिटर पाणी लागते.

दूध देणाऱ्या गायी आणि म्हशींना भरपूर पाणी लागते. कारण पाण्याच्या कमतरतेचा परिणाम दूध उत्पादनावरही होतो. जर गाय दूध देत असेल तर तिला दिवसभरात किमान ३० ते ५० लिटर पाणी पिण्याची गरज आहे. तर जर म्हशी दूध देत असेल तर तिला दिवसभरात ४० ते ७० लिटर पाण्याची आवश्यकता असते.

उन्हाळ्यात विहिरीतून घेतलेले सर्वसाधारण पाणी पिण्यासाठी द्यावे. जर नळाचा पुरवठा असेल तर ते पाणी गरम नाही ना हे तपासून घ्यावे. तसेच सामान्य तापमानाचे पाणी जनावरांसमोर स्वच्छ टाकी किंवा भांड्यात ठेवावे, जेणेकरून जेव्हा तहान लागेल तेव्हा तो त्याच्या गरजेनुसार तहान भागवतील.

**पाण्याचे फायदे**– पाणी चारा आणि अन्न पचवण्यास मदत करते. शरीराच्या वेगवेगळ्या भागांच्या पाण्याच्या गरजा पूर्ण होतात. शरीरातून अवांछित आणि विषारी घटक मूत्राद्वारे बाहेर काढले जातात.

उन्हाळ्यात शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यास पाणी मदत करते.

दुधात सुमारे ८५ टक्के पाणी असते, म्हणून एक लिटर दुधासाठी अडीच लिटर पाणी लागते.

शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळ, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर राठी, मो. ७७२००७७५५०




# चेहरा धुताना तुम्हीही 'या' चुका तर करत नाही ना? स्किन स्पेशालिस्ट सांगतात, चेहरा धुण्याची योग्य पद्धत..

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक**

त्वचेची काळजी घेण्यासाठी महिला वेगवेगळ्या गोष्टी करतात. पण अशाही अनेक महिला आहेत ज्या चेहऱ्याची काळजी घेताना काही चुका करतात. ज्यामुळे त्वचेचं नुकसान होतं. खासकरून चेहरा धुताना अनेक महिला काही चुका करतात. याबाबत डर्मेटोलॉजिस्ट डॉ. गुरवीन वराइच यांनी माहिती दिली आहे. एका व्हिडिओच्या माध्यमातून चेहरा धुताना केल्या जाणाऱ्या चुकांबाबत त्यांनी सांगितलं.




**चेहरा धुण्यासंबंधी चुका**

**डबल क्लेंजिंग करणं**डर्मेटोलॉजिस्ट म्हणाल्या की, सगळ्यांनीच डबल क्लेंजिंग करणं गरजेचं नाही. जर मेकअप लावलं असेल, धूळ–मातीतून आले असाल किंवा सनस्क्रीन लावलं असेल तर डबल क्लेंजिंग करायला हवं. पण जर तुम्ही घरात आहात, स्किन ड्राय असेल, मेकअप लावलं नसेल तर क्लेंजिंग करण्याची गरज नाही.

**६० सेकंदाचा मेकअप रूल–** चेहरा पूर्ण ६० सेकंद म्हणजे एक मिनिटांपर्यंत धुण्याचा असा काही फिक्स नियम नाही. चांगल्या क्लेंजरनं १५ ते २० मिनिटांपर्यंत चेहरा साफ करणं पुरेसं आहे.

**कोणताही साबण वापरणं**

डर्मेटोलॉजिस्ट सांगतात की, भारतात लोक जो साबण हाताला लागेल त्यानं चेहरा धुतात. पण हे चुकीचं आहे. क्लेंजर तुमच्या पीएच, ॲक्ने आणि स्किन बॅरिअरला अफेक्ट करतं. त्यामुळे एक चांगलं क्लेंजर निवडणं गरजेचं असतं.

**मायसेलर वॉटर न धुणं** – चेहरा स्वच्छ करताना केली जाणारी आणखी एक चूक म्हणजे मेकअप काढण्यासाठी वापरलं जाणारं मायसेलर वॉटर चेहऱ्यावर लावल्यानंतर ते धुवत नाहीत. अनेकांना वाटतं की, मायसेलर वॉटर धुण्याची गरज नाही. मायसेलर वॉटर चेहऱ्यावर तसंच लावून ठेवण्याचा अर्थ चेहऱ्यावर साबण लावून तसंच सोडून देणं. त्यामुळे मायसेलर वॉटर लावल्यावर चेहरा धुवायला हवा.

**सनस्क्रीन आणि फेस वॉश** जेव्हा तुम्ही दुसऱ्यांदा सनस्क्रीन लावता तेव्हा तुम्हाला चेहरा धुण्याची गरज नाही. जर तुम्ही बाहेर असाल आणि चेहऱ्यावर तेलाचा थर जमा झाला असेल तर चेहरा धुवायला हवा. त्याशिवाय जर तुम्ही स्किन ड्राय असेल तुम्ही चार भिंतीच्या आत आहात आणि स्किन साफ असेल तर सनस्क्रीन पुन्हा लावण्यासाठी चेहरा धुण्याची गरज नाही.

# प्रकरणाचा तत्काळ निपटारा होण्याच्या सुस्पष्ट अहवाल सादर करा– विभागीय श्वेता सिंह



## विभाग सत्र दिनात २१ प्रकरणे प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ अमरावती** – विहित दिन प्राप्त करण्यासाठी अर्जावर विहित कालमर्यादेत कार्यवाही करून प्रक्रिया संबंधित अर्जदारांना कळवणे प्रशासनाचे काम आहे. यानुषंगाने सर्व भागांच्या शक्तीनिहाय राज्याने सुस्पष्ट अहवाल तत्काळ सादर केला, असे निर्देश विभागीय श्वेता सिंघल यांनी संबंधित विभागाला आज दिले. पुढील दिवसात एकूण २१ प्रकरणांशी चर्चा करून त्यानुषंगाने कार्यवाही करणे आवश्यक आहे.विभागीय विभागीयालयाच्या सभागृहात श्रीमती सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली आज पहाटे दिनाचे कामकाज पार पडले. अपर संकट अजय लहान, उपा कवडे, तहक सुरक्षा वैशाली पाथरे, नायबसुंदर देशमुख पोलीस पोलीस, सामूहिक, सहकार, कृषी, जलसंपदा व ऊर्जा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.सामान्य प्रशासकीय विभागारे सादरीकरण अर्ज सादर करा ( अर्ज ७ स्वीकृत अर्ज व प्रलंबित प्रकरणे) १४ अस्वीकृत (सामान्य तक्रार) अशा एकूण २ वर सविस्तर चर्चा आजच्या विभागीय आयोगाचे दिवस.पाहण्यासाठी दिवस विभागातून बाहेर पडल्या आहेत. प्रलंबितांचा तत्काळ निपटारा होय अनिवार्यपणे अनिवार्य प्रकरण निर्देशही विभागीय महिला सिंघल संबंधित विभागप्रमुखांना दिले.

# अमरावती महानगरपालिकेतर्फे शहरातील विविध परिसरात स्वच्छतेची कार्यवाही

## सार्वजनिक जागांवर कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**अमरावती–** अमरावती शहराला स्वच्छ, सुंदर करण्यासाठी अमरावती महानगरपालिकेचे उपद्रव शोध पथक आता सार्वजनिक ठिकाणी लघवी करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ५० मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्या अधिक कठोर कारवाई करणार आहे. उपायुक्त डॉ.मेघना वासनकर यांनी उपद्रव शोध पथकांना उपरोक्त निर्देश दिले. उपायुक्त डॉ.मेघना वासनकर यांनी शहराला स्वच्छ ठेवण्यासाठी रस्त्यावर, फुटपाथवर कचरा टाकणारे, थुंकणारे, घाण करणारे, लघवी करणारे, प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्या नागरिकांवर तसेच दुकानदारांवर सुद्धा कारवाई करणे गरजेचे असल्याचे सांगितले. नागरिकांनी किंवा दुकानदारांनी कचरा गाडीवाला स्वच्छता दूताला दिला तर बाजारपेठेत स्वच्छता राखण्यात मोठी मदत होईल. त्यांनी नागरिकांना स्वच्छता ॲपचा सुद्धा वापर करण्याचे आवाहन केले. नागरिकही आपल्या मोबाईलवर प डाउनलोड करून आपली तक्रार नोंद करू शकतील. या तक्रारीचे निवारण मनपातर्फे लवकरात लवकर केले जाईल.त्यांनी सांगितले की, शोध पथकाचा माध्यमाने नागरिकांमध्ये आणि दुकानांमध्ये जनजागृती केली जाईल. त्यांना स्वच्छता प आणि उपद्रव शोध पथकाच्या दंडाच्या रक्कमेची कल्पना दिली जाईल.



यानंतरही बाजारपेठेत कचरा दिसल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल. त्यांनी दुकानदारांना आपल्या दुकानात हिरवी आणि निळी कचरा कुंडी ठेवण्याचे आवाहन केले. या कचरा कुंड्यांमध्ये ओला आणि सुका कचरा गोळा केला जाईल. मध्य झोन क्रमांक २ राजापेठ प्रभाग क्रमांक १३ अंबापेठ, गोरक्षण प्रभाग अंतर्गत साफ सफाई कंत्राटदार यांच्या द्वारे साफ सफाई कामे करुण घेण्यात आले. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्य चित्रा चौक येथे पुतळा परिसराची साफ सफाई करण्यात आली. सदर साफ सफाई कामाची पाहणी वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव व ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे यांच्या द्वारे करण्यात आली. जागो–जागी पडलेले कच–याचे ढीगारे उचलण्यात आले. कंटेनर परिसर ची साफ सफाई करण्यात आली. सर्व मुख्य रस्ते साफ सफाई करुण कचरा उचलण्यात आला. तसेच मच्छर फ़वारणी करण्यात आली.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucngmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. १६ एप्रिल २०२५ शहर/ग्रामिण


# विदर्भाला अवकाळी झोडपून काढणार

## पुढचे दोन दिवस महत्वाचे; बळीराजा चिंतेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नागपूर**

राज्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून हवामानामध्ये सतत चढ- उतार पाहायला मिळत आहे. राज्यात ऊन पावसाचा खेळ सुरूच आहे. काही जिल्ह्यांतील नागरिक उकड्याने हैराण झाले आहे. तर काही जिल्ह्यांना अवकाळी पावसाने झोडपून काढले असून बळीराजा चिंतेत आला आहे. राज्यावर आजही अवकाळीचे संकट कायम आहे. आजही हवामान खात्याकडून विदर्भात अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विदर्भातील काही जिल्ह्यांना येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, विदर्भात आजही विजांच्या कडकडाटासह आणि वादळीवाऱ्यासह पाऊस पडणार आहे. हवामान खात्याने विदर्भाला येलो अलर्ट जारी केला आहे. तर उर्वरित राज्यात आज ढगाळ वातावरण राहिल आणि काही ठिकाणी ऊन्हाचे कडक चटके बसण्याची शक्यता आहे.तसंच राज्यात पुढचे दोन दिवस अवकाळी पावसाचे असणार आहेत. मराठवाडा, विदर्भासह पश्चिम महाराष्ट्राला अवकाळी पाऊस झोडपून काढण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, नांदेड, लातूर, धाराशिव, अमरावती, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोलीमध्ये विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. या जिल्ह्यांना येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

आज विदर्भातील बुलडाणा, अकोला, अमरावती, वाशीम, वर्धा,



नागपूर, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली या सर्व जिल्ह्यांमध्ये वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. या सर्व जिल्ह्यांना हवामान खात्याने येलो अलर्ट जारी केला आहे.

मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात देखील अवकाळीची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. तर उर्वरित राज्यात अंशतः ढगाळ वातावरण राहिल आणि उष्ण व दमट हवामानाचा अंदाज आहे.

पुढचे दोन दिवस नागपूरसह विदर्भात काही ठिकाणी अवकाळी पाऊसाची शक्यता नागपूर प्रादेशिक हवामान विभागाकडून वर्तविण्यात आली आहे. विदर्भाच्या हवामानात एक द्रोनीका (अप्पर टफवे) तयार झाली आहे. त्याचबरोबर साक्लोनिक सर्कुलेशन तयार झाले आहे. त्यामुळे बंगालच्या खाडीतून मॉशचर स्लाईडर विंड वाहत आहेत. ज्यामध्ये काही भागात पाऊसाची शक्यता निर्माण झाली आहे.

याशिवाय विदर्भातील काही भागात ढगांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे. तर काही ठिकाणी सोसाट्याचा वादळी वारा असेल. विदर्भात तापमान सामान्यपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. रात्री पावसाची शक्यता असेल त्यामुळे दिवसाच्या तापमानावर फारसा फरक पडणार नसल्याची माहिती नागपूर प्रादेशिक हवामान विभागाचे प्रवीण कुमार यांनी दिली आहे.

# एकनाथ शिंदे भगव्याच्या आत दडलेले सैतान

## आमदार नितीन देशमुखांची अमरावतीत टीका



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती-** अमरावतीमध्ये शिवसेना (उबाठा) च्या विभागीय निर्धार मेळाव्यात खासदार अरविंद सावंत यांनी मोदी सरकारवर जोरदार टीका केली. सावंत यांनी मोदी सरकारच्या अपयशांची यादी मांडली. १५ लाख रुपये जमा करण्याचे आश्वासन, कर्जमाफी, महागाई नियंत्रण आणि महिलांच्या सुरक्षेबाबत सरकार अपयशी ठरल्याचे त्यांनी सांगितले.

मेळाव्यात आमदार नितीन बापू देशमुख यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करत त्यांना भगव्याच्या आत दडलेले सैतान असे संबोधले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न झाल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.कार्यक्रमाला वाशिम-यवतमाळचे खासदार संजय देशमुख, आमदार गजानन लवटे, आमदार सिद्धार्थ खरात, आमदार संजय दरेकर यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते. माजी मंत्री अशोक शिंदे, माजी खासदार अनंत गुढे, उपनेते सुधीर सूर्यवंशी आणि तीन जिल्ह्यांचे प्रमुख देखील उपस्थित होते.सावंत यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येकडे सरकारचे दुर्लक्ष होत असल्याची टीका केली. सरकार राज्यांमधील सत्तापालट करण्यात अधिक रस घेत असल्याचा आरोप त्यांनी केला. अयोध्येतील निवडणुकीत भाजपला अपयश आल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. मेळाव्याचे संचालन जिल्हाप्रमुख पराग गुडधे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

### विदर्भातील सहा जिल्ह्यांमध्ये ट्रॅक्टर मोर्चा

विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) कृती करणार आहे. पक्षाने २ मे रोजी विदर्भातील सहा जिल्ह्यांमध्ये ट्रॅक्टर मोर्चाचे आयोजन केले आहे. शिवसेनेचे खासदार अरविंद सावंत यांनी अमरावतीत झालेल्या विभागीय निर्धार मेळाव्यात या मोर्चाची घोषणा केली. अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये हा मोर्चा निघणार आहे. मोर्चाच्या यशस्वी आयोजनासाठी बाळापूरचे आमदार नितीन देशमुख यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी जबाबदारी स्वीकारली आहे. पक्षाने ५ हजार गावांमध्ये निर्धार सभा घेण्याचे नियोजन केले आहे. या मोर्चात सुमारे ५ लाख शेतकरी सहभागी होतील असा अंदाज आहे.

# अमरावतीच्या ६ खेळाडूंना प्रतिष्ठेचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार

## सर्वेश मेन, जितेश शर्मा, सांजली वानखडे, विपुल घुरडे, यशदीप भोगे, मंजिरी अलोने पुरस्काराचे मानकरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती-** अमरावतीच्या सहा खेळाडूंनी यंदा राज्याच्या क्रीडा क्षेत्रातील प्रतिष्ठेचा शिव छत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार पटकावला आहे. वीर अभिमन्यू क्रीडा मंडळ, पन्नालाल नगरचा राष्ट्रीय आट्यापाट्या खेळाडू सर्वेश मेनला वर्ष २०२२-२३ साठी तसेच एचव्हीपीएम क्रिकेट स्टेडियमवर घडलेला आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू यष्टिरक्षक फलंदाज जितेश शर्माला २०२३-२४ साठी थेट पुरस्कार देण्यात आला आहे. याच वर्षासाठी एचव्हीपीएमची राष्ट्रीय जलतरणपटू, वॉटर पोलो खेळाडू सांजली वानखडे, राष्ट्रीय रोइंग खेळाडू विपुल घुरडे, आंतरराष्ट्रीय धनुर्धर यशदीप भोगे, एकलव्य धनुर्विद्या अकादमी नांदगाव खंडेश्वरची आंतरराष्ट्रीय धनुर्धर मंजिरी अलोने यांनाही मंगळवार, १५ एप्रिलला दुपारी राज्यातील मानाचा क्रीडा पुरस्कार जाहीर झाला आहे.



सर्व सहाही खेळाडूंना शुक्रवार, १८ एप्रिलला पुण्यातील बालेवाडी-म्हाळुंगे येथे असलेल्या शिवछत्रपती क्रीडा संकुलातील बॅडमिंटन हॉलमध्ये सकाळी ११ ते २.३० या वेळेत आयोजित समारंभात राज्यपाल, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, क्रीडा मंत्र्यांच्या उपस्थितीत शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराने गौरवले जाणार आहे. सांजली वानखडे पुरस्कार प्राप्त सहाही खेळाडूंनी अथक परिश्रमाद्वारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा गाजवल्या आहेत. धनुर्धर यशदीप भोगे, मंजिरी अलोने, सांजली वानखडे, सर्वेश मेन, जितेश शर्मा आणि रोइंग (नौकायन) विपुल घुरडेनेही राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदक पटकावले आहे. सर्व खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रात विशेष ओळख निर्माण केली असून, त्यामुळेच त्यांना हा पुरस्कार मिळाला आहे. सध्या आयपीएल क्रिकेट स्पर्धा सुरू असून जितेश शर्मा खेळण्यात व्यस्त आहे. तो आरसीबीकडून यष्टिरक्षक फलंदाज म्हणून खेळत आहे. त्यामुळे त्याला या पुरस्कार वितरण समारंभाला उपस्थित राहता येणार नाही. त्याच्या ऐवजी हा पुरस्कार त्याची पत्नी शलाका जितेश शर्मा व जितेशचे प्रशिक्षक डॉ. दीनानाथ नवाथे स्वीकारतील.

हे दोघेही १७ एप्रिलला सायंकाळी पुण्याकडे रवाना होणार आहेत. या पुरस्कारामुळे अमरावतीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला जाणार आहे.

जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण मंगळवारी दुपारी २ वाजता शिवछत्रपती पुरस्कारांची घोषणा झाली. जिल्ह्यातील सहा खेळाडूंना एकाचवेळी हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाल्याबद्दल संपूर्ण जिल्ह्यातच आनंदाची लाट पसरली. सर्व खेळाडूंना ब्लेझरसह समारंभाला उपस्थित राहायचे असल्याने शासनाकडून ब्लेझर शिवण्याचा खर्च, एसी थ्री टायर प्रवास भत्ता, दैनिक भत्ता दिला जाणार आहे. तसेच पुरस्कार विजेत्यासोबत १० जणांना प्रवेश दिला जाणार आहे.

# डीजेवर गाणे न वाजविल्याने पोस्टर फाडले

## उमरी मंदिर येथील घटना, सैन्यदलाच्या जवानाविरुद्ध गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अंजनगाव सुर्जी**

तालुक्यात उमरी मंदिर येथे डॉ. आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचा समारोप होत असतानाच डीजेवर गाणे न वाजविल्यावरून भारतीय सैन्य दलाच्या एका जवानाने गोंधळ घालून जयंतीनिमित्त लावलेले पोस्टर फाडले. त्यावरून गावात तनाव निर्माण झाला. गावकऱ्यांनी पोलीस ठाण्यावर धडक दिली. पोलिसांनी संबंधित सैनिकाविरुद्ध गुन्हा नोंदविला.उमरी मंदिर या गावात भीमसैनिकांनी चौकाचौकात अभिवादनाचे पोस्टर लावले होते.

संध्याकाळी सहा वाजता गावातून मिरवणूक काढण्यात आली. रात्री १० वाजता ही मिरवणूक आपल्या ठिकाणी बुद्धविहार येथे पोचली. त्यासाठी सर्व समाजातील नागरिकांचे सहकार्य मिळाले. डिजेवर आग्रहावरून शेवटचे गाणे न वाजविल्याच्या कारणावरून धीरज दिलीप ढोके (वय २७, रा. उमरी मंदिर) याने गोंधळ घातला तसेच भूरीमाता चौकातील पोस्टर फाडून टाकले. त्याची माहिती तेथील महिला मंडळ व बौद्धउपासिकांनी ११२ वर कॉल करून दिली.रहीमापूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अनंत वडतकर व कर्मचाऱ्यांनी त्या ठिकाणी पोहोचून धीरज दिलीप ढोके याला ताब्यात घेतले. त्यानंतर १५ ते २० महिला तसेच पुरुष मंडळीने पोलीस ठाण्यात धडक दिली. संबंधिताविरुद्ध कारवाई करावी, अशी मागणी केली. त्यानुसार रहिमापूर पोलीसांनी कलम २९८ नुसार धार्मिक भावना दुखावल्याचा गुन्हा नोंदवित धीरज ढोके याला ताब्यात घेतले. ए एस आय गजानन वर्मा तपास करीत आहेत.

# फळांच्या राजाला ६०० रुपये डझनचा भाव

## बैगनपल्ली, लाल पट्टा, केसर, चर्कुलस आंबा ८० ते १४० रु. किलो

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती-** उन्हाळा आला की, प्रत्येकाला आमरसाची ओढ लागते. सध्या उन्हाळ्याच्या सुट्या लागल्या असून पाहुण्यांना पाहुणचारात आंब्याचा रस वाढला जात असल्यामुळे रसाच्या आंब्याला मागणी वाढली आहे. रत्नागिरी, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशासह जिल्ह्याच्या विविध भागातून आंब्याची आवक सुरू झाली आहे. त्यामुळे सध्या हापूस आंबा ४०० ते ६०० रुपये डझन असा भाव खात आहे. बैगनपल्ली, केसर, लाल पट्टा, चर्कुलस या आंब्याचा दर



दर्जानुसार ८० ते १४० रु. किलो आहे. तरीही सध्या आंब्याच्या रसाचे शौकीन किमान एक ते दोन किलो रसाचे आंबे खरेदी करत आहेत. जिल्ह्यात कुरड्या, सरगुंड्या, तांदळाच्या पापडासोबत आंब्याचा रस सेवन केला जातो. तसेच उकडलेल्या शेवया आणि सरगुंड्यांसोबत आंब्याचा रस खाण्याची मजाच काही औरच आहे. त्यामुळे पाहुणे आले की, त्यांना आंब्याच्या रसाचा पाहुणचार केला जात आहे.मागील दोन ते तीन आठवड्यात सर्वच आंब्यांचे दर घसरले आहेत. त्यामुळे सध्या आंब्याचा रस खाण्यास प्राधान्य दिले जात आहे. सण, उत्सवातही नैवेद्य तयार केला की, त्यात आंब्याचा रस असतोच. सोबतच मँगो शेक तयार करणे किंवा तसाच आंबा खाण्यासही अनेक जण प्राधान्य देत असतात. त्यामुळेच सध्या बाजारात सर्वत्र विविध प्रकारचे आंबे विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत.

# सर्वाधिक लग्नाचे बार उडणार मे महिन्यात; एप्रिलनंतर फक्त २७ दिवस विवाहांचे मुहूर्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती-** एप्रिल आणि मे महिन्यात लग्नाचे अधिक मुहूर्त असल्याने या दोन महिन्यात सगळ्यात जास्त लग्नाचे बार उडणार आहेत. जून महिन्यात फक्त पाच मूहूर्त आहेत. ८ जून ते २२ नोव्हेबरर्यंत गुरूचा अस्त आणि चातुर्मास असल्याने लग्नाचे मुहूर्त नाहीत.

एप्रिल आणि मे महिन्यातील मुहूर्तांना सर्वांची पसंती असल्याचे मंगल कार्यालय, हॉटेल्स, रिसॉर्ट आणि वेडिंग डेस्टिनेशच्या नोंदणी वरून दिसते.



मे महिन्यात १२ दिवस लग्नाचे मुहूर्त असून या सर्व तारखांना हॉल आणि मंगल कार्यालयांचे ॲडव्हान्स बुकिंग झाले आहे. एप्रिलमध्ये त्यापाठोपाठ आठ तर जूनमध्ये फक्त पाच मुहूर्त आहेत. आठ जूनपासून ते ११ नोव्हेंबरपर्यंत गुरूचा अस्त व चातुर्मास आहे. त्यामुळे लग्नाचे मुहूर्त नाहीत. एप्रिल, मे आणि जून असे तीनच महिने सर्वाधिक मुहूर्त आहेत.

१४ एप्रिलपासून यंदा डिसेंबर महिन्यापर्यंत फक्त २७ लग्नाचे मुहूर्त आहेत. नोव्हेंबरमध्ये एक आणि डिसेंबरमध्ये दोन असे तीनच मुहूर्त वर्ष अखेरीस आहे.

पाच डिसेंबरपासून ते ६ फेब्रुवारीपर्यंत शुक्राचा अस्त आहे. त्यामुळे मुहूर्त नाहीत.

त्यामुळे एप्रिल आणि मेतील लग्नाचे मुहूर्त साधून घेण्यासाठी सर्वांची धावपळ सुरू आहे. वधुवरांसोबतच लग्नाचे हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स, शालू, पैठणी आणि साड्या तसेच सराफा व्यापाऱ्यांमध्येही चैतन्य निर्माण झाले आहे. या सर्वांचीच लगीनघाई सुरू झाली आहे.

### विवाह मुहूर्त २०२५

एप्रिल : १८, १९, २०, २१,२२,२५,३०

मे १, ६,७,८,९,१०, १३,१४, १६, १८,२३,२४

जून : २, ४,५,६,८

नोव्हेबर : २

डिसेंबर : २, ५

एप्रिल आणि मे मध्ये सर्वाधिक विवाह मुहूर्त आहेत. गुरूचा अस्त, चातुर्मास आणि शुक्राचा अस्त असल्याने लग्नाचे मुहूर्त कमी आहेत.

# २ कार समोरासमोर धडकल्या; तरुणाचा मृत्यू, ४ जण जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६मूर्तिजापूर -** दर्यापूर रोडवरील नायरा पेट्रोल पंपासमोर दोन कारची समोरा-समोरा धडक झाली. या अपघातात एकाचा मृत्यू तर चार जण जखमी झालेत. ही घटना मंगळवारी सायंकाळी सात वाजता घडली आहे.



शहेबाज खान अहमद खान (३०) रा. सोनोरी रा. मूर्तिजापूर असे मृत तरुणाचे नाव आहे. तर अब्दुल आबीद अ. राजीक (२७), आदीबा समर नासिर हुसेन (२४), अल्फीया अनम जिया खान (२३), रेहना परवीन अहमद खान (५०) खालीद खान सहेबाज खान (३) सर्व रा. सोनोरी, ता. मूर्तिजापूर अशी जखमींचे नावे आहेत. खान कुटुंबीय सोनोरी येथून दर्यापुरात लग्न सोहळ्यासाठी आले होते. दरम्यान पनोरा नजीकच्या नायरा पेट्रोल पंपासमोर समोरून येणाऱ्या भरधाव कारने जोरदार धडक दिली. या अपघातात शहेबाज खान अहमद खान यांचा मृत्यू झाला. उपजिल्हा रुग्णालयातून तातडीने सर्व जखमींना पुढील उपचारासाठी अमरावती येथे हलवले आहे. घटनेची माहिती शहरात पसरताच नातेवाईक व नागरिकांनी उपजिल्हा रुग्णालयात गर्दी केली होती. घटनास्थळी परिविक्षाधीन उपविभागीय पोलिस अधिकारी शिवम विसापुरे यांनी भेट देऊन पाहणी केली. धडक देणाऱ्या कारचा चालकही जखमी झाल्याची माहिती आहे.

# नवनीत राणा यांच्या पाठपुरावाने आज पूर्ण झाले अमरावतीकरांचे उड्डाणचे दिव्य स्वप्न

## २० वर्षात कोणीही करू शकले नाही, नवनीतने फडणवीसांच्या नेतृत्वात ते करून दाखवले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती –** एप्रिलपासून विभागीय मुख्यालय अमरावती शहरात वर्षानुवर्षे पाहिलेले स्वप्न साकार होत आहे. २० वर्षात जे कोणालाही शक्य नव्हते ते तत्कालीन खासदार नवनीत रवी राणा यांनी करून दाखविले आहे. त्यांच्या सकारात्मक विचारसरणीने आणि जिल्ह्यात औद्योगिक क्रांती घडवून आणण्यासाठी विमान सेवा सुरू करण्यासाठी त्यांनी दिल्ली ते मुंबई कित्येकदा असा पाठपुरावा केला की आज बेलोरा (अमरावती ) विमानतळावरून नियमित विमान वाहतूक सुरू होत आहे. देशाचे सर्वात यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी, तत्कालीन केंद्रीय विमान वाहतूक मंत्री हरदीप सिंग सुरी यांच्या नेतृत्वाखाली, ज्योतिरादित्य सिंधिया यांनी केंद्राच्या उडान योजनेत बेलोरा विमानतळाचा समावेश करून त्याला एक नवीन जीवन दिले. नवनीत राणा यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे सर्व प्रकारच्या तांत्रिक अडचणींवर मात केल्यानंतर, पुन्हा एकदा २०० कोटी रुपयांचा निधी उभारण्यात आला. त्यावेळी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने, नवनीत राणा यांनी बेलोरा विमानतळ विस्तार अंतिम टप्प्यात नेले.

अमरावतीच्या बेलोरा विमानतळाचा विस्तार गेल्या २० वर्षांपासून प्रलंबित होता. अमरावती लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आल्यानंतर, नवनीत रवी राणा यांनी आपल्या दूरदृष्टीने बेलोरा विमानतळाच्या विस्तारातील अडथळे प्रथम समजून घेतले. जिल्ह्यातील औद्योगिक विकासासाठी



आवश्यक असलेल्या बेलोरा विमानतळाच्या विस्ताराला गती देण्यासाठी केंद्रीय पातळीवर शक्य तितके प्रयत्न सुरू करण्यात आले. त्यांच्या प्रयत्नांमुळे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वाकांक्षी उडान योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात बेलोरा विमानतळाला १०० कोटी रुपये मंजूर करण्यात आले.सतत पाठपुरावा, थेट निरीक्षण दरम्यान, राज्यात सत्ता बदल झाल्यानंतर बेलोरा विमानतळाचे काम पुन्हा एकदा रखडले होते. नंतर कोविड-१९ च्या दुष्परिणामांमुळे काम थांबले, पण कोरोना साथीचा प्रभाव कमी होताच. विमानतळाच्या विस्ताराला गती देण्यासाठी नवनीत राणा यांनी नव्या जोमाने दिल्ली आणि मुंबई दरम्यान अनेक फेऱ्या केल्या. नवनीत राणा यांनी तत्कालीन विमान वाहतूक मंत्री हरदीप सिंग सुरी आणि ज्योतिरादित्य सिंधिया यांना सतत भेटून दबाव निर्माण केला. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (एमएडीसी) च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठकांची मालिका सुरूच राहिली. निधीच्या कमतरतेवर मात करण्यासाठी, तत्कालीन नागरी विमान वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांना उडान योजनेअंतर्गत उर्वरित निधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली. यासाठी नवनीत राणा सतत पाठपुरावा करत राहिली. त्यानंतर हे सत्य समोर आले की, तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने बेलोरा विमानतळाच्या विस्तारावर केंद्राचा १०० कोटी रुपये खर्च केल्याचा अहवाल सादर केला नाही. त्यानंतर या दिशेने सावलीसारखे त्यांना पाठिंबा देणारे आमदार रवी राणा यांनी राज्य सरकार पातळीवर पाठपुरावा केला. ही तांत्रिक अडचण दूर झाल्यानंतर खासदार नवनीत राणा यांनी बेलोरा विमानतळाच्या विस्तारासाठी निधीच्या कमतरतेचा प्रश्न सोडवण्यासाठी सतत दबाव आणून केंद्र सरकारला आवाहन केले. त्यांच्या सतत पाठपुरावामुळे दुसऱ्या टप्प्यात २०० कोटी रुपये मिळाले. त्यामुळे बेलोरा विमानतळावरील वर्षानुवर्षे रखडलेले टर्मिनल इमारत आणि एटीसी टॉवरचे काम युद्धपातळीवर सुरू करता आले. नवनीत राणा इथेच थांबल्या नाहीत, त्यांनी अनेक वेळा विमानतळाला भेट दिली आणि बांधकामाचा आढावा घेतला.प्रत्येक अडथळ्यावर मात केलीकोणत्याही शहराचा किंवा जिल्ह्याचा विकास त्या भागातील वाहतूक सेवेवर अवलंबून असतो. मग ती रस्ते सेवा असो, रेल्वे असो किंवा विमान सेवा असो. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी, नवनीत रवी राणा यांनी वाहतुकीच्या तिन्ही पद्धतींवर लक्ष केंद्रित केले. या संदर्भात, त्यांच्या प्रयत्नांचे फलित म्हणून, अलायन्स एअर एटीआर ७२ सीटर नियमित उड्डाण आता बेलोरा विमानतळावरून सुरू होत आहे. यामुळे जिल्ह्यातील औद्योगिक विकासाला पंख लागणार आहे. ज्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होईल. बेलोरा विमानतळावरून झालेल्या या उड्डाणाबद्दल खासदार नवनीत रवी राणा यांनी देशाचे यशस्वी आणि लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी, तत्कालीन केंद्रीय विमान वाहतूक मंत्री हरदीप सिंग सुरी, ज्योतिरादित्य सिंधिया, सध्याचे केंद्रीय विमान वाहतूक मंत्री किंजरापू राम मोहन नायडू आणि राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे मनापासून आभार मानले आहेत.

# पिकअप-दुचाकीच्या अपघातात एक ठार, दोन गंभीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६धारणी** धारणी ते हरिसाल मार्गावर काढाव फाट्या नजीक एका पिकअप वाहनाची दुचाकीला आमोरासमोर धडक बसल्याने दुचाकीस्वार युवकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर त्याच्यासोबत दुचाकीवर बसलेल्या दोन मुली गंभीररित्या जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. जखमी दोन्ही मुली अपघातात मरण पावलेल्या रोहीतच्या मेहुण्या असल्याची माहीती प्राप्त झाली आहे.

प्राप्त माहितीनुसार धारणी येथून माल घेऊन हरिसालकडे जाणारी पिकअप वाहनाची (क्रमांक एम एच ३० बिडी ४८३०) विरुद्ध दिशेने येणाऱ्या




मोटार सायकलला (क्रमांक एम एच ४७ एन एम एम ६८३३)जोरदार धडक बसली. या अपघातात दुचाकीचालक रोहीत मौजीलाल कास्देकर (वय २८ वर्षे, रा. लवादा) हा जागीच ठार झाला असून त्याच्यासोबत दुचाकीवर बसलेल्या अंजली रामदु दारशिंबे (वय २०) आणि मोनीका राजु दारशिंबे (वय १० वर्षे, दोन्ही रा. डवाली-मध्यप्रदेश) या गंभीररित्या जखमी झाल्या आहेत. दोन्ही मुलींचे पाय फ्रॅक्चर असल्याची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली असून त्यांच्यावर धारणी उपजिल्हा रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत. धारणीचे पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस जमादार प्रवीण बोंडे, जीवन गोडांबे यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. पुढील तपास करीत आहे.

# आता धावत्या रेल्वेत काढता येणार पैसे

## पंचवटी एक्स्प्रेसमध्ये ATM ची सोय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मुंबई-** धावत्या ट्रेनमध्ये एटीएम सुविधा उपलब्ध करण्यात मध्य रेल्वेला यश आले आहे. मुंबई ते मनमाड दरम्यान धावणाऱ्या मध्य रेल्वेच्या पंचवटी एक्स्प्रेसमध्ये आता एटीएमची सुविधा उपलब्ध झाली असूनअशा प्रकारची सुविधा असलेली ही पहिलीच एक्सप्रेस आहे.




त्यामुळे आता प्रवासादरम्यानही प्रवाशांना रोख रक्कम काढण्याची सोय होणार असल्याने प्रवाशांना फायदा होणार आहे. तसेच रेल्वेच्या महसुलात देखील वाढ होणार असल्याचे बोलले जात आहे. रेल्वे गाड्यांमध्ये एटीएम बसवण्याचा विचार प्रथम भुसावळ विभागाने आयोजित केलेल्या नाविन्यपूर्ण गैर-भाडे महसूल ग्राहक संवाद बैठकीत मांडण्यात आला होता. या कल्पनेला प्रतिसाद देत, बँक ऑफ महाराष्ट्रने नवीन, नाविन्यपूर्ण गैर-भाडे महसूल कल्पना योजना (छ्खछ्त्रऋख्ड) अंतर्गत औपचारिक प्रस्ताव सादर केला होता. सध्या गाडी क्रमांक १२११० मनमाड-मुंबई सीएसएमटी मनमाड पंचवटी एक्सप्रेसमध्ये या सेवेच्या व्यवहार्यता व कार्यक्षमतेची चाचणी सुरू आहे. ही गाडी दररोज मनमाड ते मुंबई सीएसएमटी दरम्यान धावते. एकूण २२ डब्यांच्या या गाडीची आसन क्षमता २०३२ असून दररोज सुमारे २२०० प्रवासी दररोज प्रवास करतात. संपूर्ण गाडी वेस्टिब्यूल कनेक्टेड असल्यामुळे सर्व श्रेणीतील प्रवाशांना या एटीएमचा सहज लाभ घेता येणार आहे.

**लवकरच सेवा प्रवाशांसाठी खुली-** मध्य रेल्वेच्या मनमाड वर्कशॉपमध्ये आवश्यक तांत्रिक बदल करून एक खास कोच तयार करण्यात आला आहे. यामध्ये एटीएम बसवण्यात आले असून, हा कोच आता पंचवटी एक्स्प्रेसला जोडण्यात आला आहे. मंगळवारी सकाळी ही एटीएम सेवा असलेली ट्रेन मुंबईत दाखल झाली. हे एटीएम 'एक्स्प्रेस' सेवेच्या एसी चेअर कार कोचमध्ये बसवण्यात आले असून, लवकरच ही सेवा प्रवाशांसाठी खुली करण्यात येणार आहे. चालत्या ट्रेनमध्ये एटीएम सुरळीतपणे कार्यरत राहावे यासाठी योग्य विद्युत प्रणाली आणि संरचनात्मक उपाययोजना करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

**प्रवाशांसाठी सुविधा उपयुक्त ठरणार –** दरम्यान, हा संपूर्ण उपक्रम योजना भारतीय रेल्वेच्या विद्युत व यांत्रिक विभागांच्या समन्वयातून राबवला जात आहे. या ऑनबोर्ड एटीएम सेवेमुळे प्रवाशांना प्रवासादरम्यान सहज आर्थिक व्यवहार करता येणार असून विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि आकस्मिक गरज असलेल्या प्रवाशांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. ही एटीएम सेवा मोबाईल नेटवर्कद्वारे सतत जोडलेली राहणार असून, गाडी सुरू असतानाही खऱ्या वेळेत व्यवहार शक्य होणार आहे. एटीएमची सुविधा ही पहिलीच एक्स्प्रेस ठरली आहे.

# बहुमत असेल तर नगरसेवक दाखवू शकतील नगराध्यक्षांना घरचा रस्ता; राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मुंबई-** राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरींच्या नगराध्यक्षांना पदावरून हटविण्याचे अधिकार नगरसेवकांना देण्याचा महत्त्वाचा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. राज्यात सध्या कार्यरत असलेल्या १०५ नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरींसाठी हा निर्णय लागू असणार आहे. अध्यादेश काढून या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी केली जाणार आहे.

नगराध्यक्षांना पदावरून हटवण्यासाठी निवडून आलेल्या नगरसेवकांच्या संख्येपैकी दोन तृतीयांश संख्येने नगरसेवकांच्या सह्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना पाठवता येईल. या प्रस्तावावर जिल्हाधिकाऱ्यांना १० दिवसांच्या आत विशेष सभा आयोजित करून मतदानाद्वारे निर्णय घ्यावा लागेल

सरकारने अधिनियमात सुधारणा केल्याने अनेक वर्ष रखडलेल्या स्थानिक



स्वराज्य संस्थांच्या निवडणुका यंदाच्या वर्षी दिवाळीनंतर होण्याचे संकेत मिळत आहेत.

यापूर्वी नगराध्यक्षांना पदावरून बाजूला सारण्याच्या प्रक्रियेत निवडून आलेल्या नगरसेवकांपैकी ५० टक्के नगरसेवकांच्या सह्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवला जात असे. त्यानंतर राज्य सरकारच्या स्तरावर याबाबतचा निर्णय होत असे. आता सरकारने आपले अधिकार सध्या अस्तित्वात असलेल्या १०५ नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरीच्या लोकनियुक्त नगरसेवकांना दिले आहेत. या १०५ स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत येत्या दोन वर्षात संपत आहे.

# जिवंत विद्युत तार उभ्या पिकावर पडल्याने गहू जळाला

## शेतकऱ्याचे ४० हजार रुपयांचे नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१६तिवसा** :वादळी वाऱ्यामुळे उभ्या गव्हावरून गेलेल्या वीज वाहिनीचा जिवंत तार तुटून अचानक गव्हाच्या पिकावर पडल्याने झालेल्या घर्षणात शेतकऱ्याचा अर्ध्या एकरातील गहू जळून खाक झाला. ही घटना १२ एप्रिल रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास तिवसा शेतशिवारात घडली.

रमेश केशवराव ठाकरे यांचे तिवसा भाग ४ मध्ये शेत आहे. ते अल्पभूधारक शेतकरी असून त्यांनी त्यांच्या एक एकर शेतात यावर्षी गहू पेरला होता. मोठ्या मेहनतीने गहू उभा केला मात्र १२ एप्रिल रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास वादळी वारा आला व यातच जिवंत वीज वाहिनीचा तार खिराडीतून तुटून खाली कोसळली. यामुळे झालेल्या घर्षणात रमेश ठाकरे यांचा अर्ध्या एकरातील उभा गहू जळून खाक झाला. सदर घटनेत शेतकऱ्याचे अंदाजे ४० हजार रुपयांचे नुकसान झाले असून वीज वितरण कंपनीने घटनास्थळी पाहून करून पंचनामा केला आहे. झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याची मागणी शेतकऱ्याने केली आहे.

# अंगणवाडी सेविकांची भरतीप्रक्रिया वांद्यात ४५ जागांवरील नियुक्त्या रखडल्या



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती –** अंगणवाडी व मदतनीस यांच्या नियुक्तीवर आक्षेप आल्याने निवडीनंतरही त्यांच्या नियुक्त्या रखडल्या आहेत. अन्य उमेदवारांकडून घेण्यात आलेल्या आक्षेपांची चौकशी करण्यात येणार असून त्यानंतरच नियुक्तीचा मार्ग मोकळा होणार आहे. दरम्यान जिल्ह्यातील २५२ अंगणवाडी व मदतनीसांना नियुक्तीचे आदेश

**प्रकल्पनिहाय आक्षेप असलेली पदसंख्या**

अंगणवाडी सेविका (२२)वरुड : २, अमरावती : ५,दर्यापूर : २, धामणगावरेल्वे :३,भातकुली : ५, नांदगावखंडेश्वर१, चिखलदरा : २, धारणी :२, मदतनीस (२३) : अमरावती१५, दर्यापूर : ५, मोर्शी : २,चांदूरेल्वे : १

देण्यात आले आहेत.जिल्ह्यात २ हजार ५९२ अंगणवाडी केंद्र असून या केंद्रांमध्ये २ हजार ४७८ अंगणवाडी सेविका आणि २ हजार ४०९ मदतनीस कार्यरत आहेत. तर अंगणवाडी सेविकांची ११४ व मदतनीसांची १८३ पदे रिक्त आहेत. या रिक्त पदांसाठी भरतीप्रक्रिया राबविण्याकरिता शासनाने मंजुरी दिल्यानंतर गत महिन्यात महिला व बालकल्याण विभागामार्फत प्रकल्पस्तरावर भरतीप्रक्रिया राबविण्यात आली.२९७ जागांसाठी झालेल्या या पदभरतीत निवड झालेल्या अंगणवाडी सेविकांच्या २२ व मदतनीसांच्या २३, अशा एकूण ४५ जागांवर आपेक्ष घेण्यात आले आहेत. भरतीप्रक्रियेत सहभागी अन्य उमेदवारांनी आक्षेप दाखल केले आहेत. त्यामुळे नियुक्ती आदेश रोखण्यात आले असून जिल्हास्तरावर चौकशी आणि सुनावणी घेण्यात येणार आहे.

# दुचाकीच्या चाकात साडी अडकल्याने महिलेचा मृत्यू

## कंपनीतील सहकाऱ्यासोबत बाजारात जात होती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती,** – कंपनीतील सहकाऱ्यासोबत दुचाकीवर बाजार करण्यासाठी जात असलेल्या महिलेच्या साडीचा पदर दुचाकीच्या चाकात अडकल्याने महिलेचा मृत्यू झाला. सहकाऱ्याने दुचाकी हलगर्जीपणामुळे चालविल्याने हा अपघात घडला. नांदगावपेठ एमआयडीसी भागातील मार्गावर ही घटना घडली. वैशाली राजेश यादव (३३) रा. डिगरगव्हाण असे मृतकचे नाव आहे. माहितीनुसार, वैशाली यादव ही नांदगावपेठ एमआयडीसीमधील एका कंपनीत कामाला आहे. १४ एप्रिल रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास शिफ्ट संपल्यानंतर वैशाली कंपनीतील सहाकारी लितु उर्फ रमेश रघुनाथ




श्यामल (४०) मुळ रा.उडीसा, हल्ली मुक्काम सावर्डी गावात पाण्याच्या टाकीजवळ याच्यासोबतत्याच्या एमएच-४०-डी-४५७२ क्रमांकाच्या दुचाकीने नांदगावपेठ येथील बाजारात खरेदी करण्यासाठी जात होती. कंपनीतून निघाल्यापासूनच लितु उर्फ रमेश दुचाकी अतिशय हलगर्जीपणाने व भरधाव वेगाने चालवित होता. अशातच दुचाकी एमआयडी परिसरातील मेन गेटजवळ आली असता वैशालीचा पदर दुचाकीच्या मागील चाकात अडकल्याने दुचाकी अनियंत्रीत होऊन रस्त्यावर घसरली. दुचाकीवर रस्त्यावर आढळल्याने वैशालीच्या डोक्याला गंभीर मार लागला. वैशालीला तात्काळ इर्विनमध्ये दाखल करण्यात आले. परंतु, डॉक्टरांनी तपासणीनंतर तिला मृत घोषित केले. याबाबत वैशालीचा मोठा भाऊन अमोल पुंडलीकराव इंगळे (३८) रा. डिगरगव्हाण यांनी नांदगावपेठ पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर पोलिसानी आरोपी लितु उर्फ रमेश श्यामलविरोधात अपघात घडवून मृत्यूस जवाबदार असल्याबाबत गुन्हे दाखल केले असून पोलिस पुढील तपास करित आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाची जागा आरक्षित करण्याचा प्रस्ताव तातडीने शासनास पाठवावा !

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी दर्यापूरची मागणी !

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६दर्यापूर** :राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अमोल गहरवार यांनी दिनांक १६ जानेवारी रोजी नागपरिषद कार्यालयाला निवेदनामार्फत नगरपरिषदेच्या मुख्य कार्यालयालगत असलेल्या खुली जागा छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाकरिता आरक्षित करून घ्यावी ही मागणी केलेली होती त्या संबंधीची वरिष्ठ स्तरांवरील कार्यवाही केल्याच्या नंतर ती जागा आरक्षित करण्यात येत असल्याची जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रकाशित करण्यात आलेली होती त्या संबंधीची मुदत संपलेली असून जागा आरक्षित करण्याचा प्रस्ताव पुढील कार्यवाही करिता लवकरात लवकर राज्य शासनास पाठवण्यात यावा अशी मागणी यावेळी निवेदनातून करण्यात आली यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अमोल अशोकसिंह गहरवार , राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष



निलेश पाटील मोपारी , जिल्हा सचिव ऍड. जगदीश भाऊ विल्हेकर ,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बाबूभाई खान , जिल्हा सरचिटणीस कुलदीप काळे , राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे मा. अध्यक्ष नितिन गावंडे, शहर उपाध्यक्ष कपिल पाटील पोटे , किरण पाटील अरबट, विद्यार्थी काँग्रेस चे मा. शहराध्यक्ष प्रतिक नाकट , योगेश पाटील हिंगणकर , अमोल भाऊ चव्हाण , मोहन भाऊ अंभोरे इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.-

# अमरावतीच्या (बेलोरा) विमानतळ लोकार्पणाचे काही छायाचित्रे !

















## 'नीट' च्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी नवी संकल्पना
## थेट परीक्षा केंद्रावर होणार विद्यार्थ्यांची मॉक टेस्टवे एज्युकेशन इंनेशेटीव्हचा उपक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

वैद्यकीय शिक्षणासाठी अत्यंत स्पर्धात्मक समजली जाणारी नीट परीक्षा दरवर्षी लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य ठरवते. या परीक्षेची तयारी करताना अनेक विद्यार्थी उच्च दर्जाच्या शिकवण्या लावतात, भरपूर मेहनत घेतात, मात्र परीक्षेच्या दिवशी येणारा मानसिक तणाव आणि अपरिचित वातावरणामुळे अनेक वेळा त्यांचे प्रदर्शन अपेक्षेप्रमाणे होत नाही. हीच अडचण ओळखून वे एज्युकेशन इंनेशेटीव्हने एक अभिनव उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या काळात नीट परीक्षेसाठी ज्या परीक्षा केंद्रांवर परीक्षा घेतली जाणार आहे, त्याच केंद्रांवर पूर्वतयारी म्हणून नीट विद्यार्थ्यांची 'मॉक टेस्ट' घेण्यात येणार आहेत.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परीक्षा केंद्राचा अनुभव मिळणार असून, परीक्षेपूर्वीच त्या वातावरणाशी ते परिचित होतील. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि परीक्षेदरम्यान येणारा तणावही कमी होईल.शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञांनी या उपक्रमाचे कौतुक केले असून, असे प्रयोग इतर स्पर्धा परीक्षांमध्येही राबविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे. पालक आणि विद्यार्थी वर्गानेही या उपक्रमाचे स्वागत करत, ही एक सकारात्मक पावले असल्याचे मत नोंदवले आहे.

शिक्षण क्षेत्रातील अनपेक्षित बदल घडविण्यासाठी वे एज्युकेशन इंनेशेटीव्ह ही संस्था मागील चार वर्षांपासून कार्यरत असून कोचिंग क्लास मध्ये टॉपर असलेले विद्यार्थी नेमके परीक्षा देतांना का गोंधळून जातात, गुण कसे कमी होतात याबाबत त्यांनी निष्कर्ष काढल्यानंतर मॉक टेस्ट चा उपक्रम त्यांनी राबवून बघितला. या उपक्रमांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी अतिशय चांगल्या प्रकारे परीक्षा देऊन त्याचा निकाल सुद्धा अपेक्षेपेक्षा चांगला लागला त्यामुळे विद्यार्थी आणि पालक सुद्धा या मॉक टेस्ट ला प्रभावित होऊन पाल्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी वे एज्युकेशन इंनेशेटीव्हला प्राधान्य देत आहेत.

### विद्यार्थ्यांना परीक्षा वातावरणाशी सुसंगत होण्यासाठी कुत्रीम प्रयत्न

मॉक टेस्ट दरम्यान विद्यार्थ्यांना परीक्षेच्या खऱ्याखुऱ्या वातावरणाचा अनुभव मिळावा, यासाठी 'वे एज्युकेशनइनेशेटिव्ह'च्या वतीने विशेष उपक्रम राबवण्यात आला आहे. वास्तविक परीक्षेदरम्यान येणाऱ्या अनपेक्षित अडथळ्यांसाठी – जसे की वीजपुरवठा खंडित होणे, बाह्य आवाज, वादविवादाचे प्रसंग इत्यादी – मानसिक तयारी होणे आवश्यक असते. याच उद्देशाने, अशा अडचणी कृत्रिमरित्या निर्माण करून विद्यार्थ्यांना त्या परिस्थितीचा सामना करण्यास तयार केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये तणावाचे व्यवस्थापन आणि एकाग्रता टिकवून ठेवण्याची क्षमता विकसित होते, जे आगामी परीक्षेसाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

### २४,२५,२८ ला मॉक टेस्ट

येत्या ४ मे रोजी नीट ची परीक्षा असून हजारो विद्यार्थी या परीक्षेला बसणार आहेत.शहरातील विविध कोचिंग क्लास मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वे एज्युकेशन इंनेशेटीव्हने २४,२५,२८ एप्रिल रोजी शहरातील पी आर पोटे पाटील कॉलेज, माणिबाई गुजराथी महाविद्यालय, ब्रिजलाल बियाणी या महाविद्यालयात मॉक टेस्ट चे आयोजन केले असून ज्या विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी व्हायचे आहे त्यांनी खालील ८५३०४४६२२२ क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन वे एज्युकेशन इंनेशेटीव्हने केले आहे.

## नवाथे चौकात राणा दाम्पत्यांकडून मुख्यमंत्री फडणवीस यांचे जंगी स्वागत




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

गेल्या अनेक वर्षापासुन अमरावती विमानतळाचा प्रश्न थंड बस्त्यात होता. परंतु खासदार झाल्यानंतर नवनीत रवि राणा यांनी केंद्र शासनाकडे तसेच आ.रवि राणा यांनी राज्य शासनाकडे अथक प्रयत्न करुन अमरावती विमानतळ सुरु करण्याकरिता तत्कालीन केंद्रीय उड्डान मंत्री तथा वर्तमान केंद्रीय उड्डान मंत्री ज्योतीरादित्य सिंधीया यांच्याकडुन १७५ कोटी रुपयाचा निधी मंजुर करुन आणला. याच निधीमधुन अमरावती विमानतळाचे अपुर्ण काम पुर्णत्वास नेण्यास मा.खा.नवनित रवि राणा यांनी अथक प्रयत्न केले त्या प्रयत्नांना यश मिळाले असुन आज दि.१६ एप्रिल रोजी अमरावती विमानतळाचे औपचारिक उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस तसेच केंद्रीय उड्डान राज्यमंत्री श्री.नायडू यांच्या हस्ते तसेच उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महसुल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. अमरावतीसाठी विमानतळ सुरु करुन अमरावती जिल्हा वासियांचा मान संपुर्ण देशामध्ये वाढविल्याबद्दल आ.रवि राणा व मा.खा.नवनित राणा यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नवाथे चौक येथे भव्य दिव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. विमानतळाचे उद्घाटन झाल्यानंतर लगेच मुख्यमंत्र्यांचा ताफा नवाथे चौक येथे आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी मंचावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य दिव्य मुर्तीला हारार्पण करुन पुजन केले तसेच यानंतर आ.रवि राणा व मा.खा.नवनित रवि राणा यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्यावर फुलांची उधळण करुन व गउइ ने हार टाकुन जाहीर सत्कार केला. तसेच अमरावती साठी कोंडेश्वर रोड, वडद बडनेरा येथे शासकिय मेडिकल कॉलेज मंजुर करुन १६०० कोटी रु. दिल्याबद्दल, अमरावती नांदगाव पेठ चखऊ येथे टेक्सटाईल्स पार्क दिल्याबद्दल, विदर्भातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना ८३२ कोटी रु. दिल्याबद्दल, ग्रामिण पोलीसांसाठी वसाहत निर्माण करण्यासाठी उठऋ निधी अंतर्गत १७५ कोटी रु. मंजुर करुन दिल्याबद्दल आ.रवि राणा व मा.खा.नवनित राणा यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे आभार व्यक्त करुन केला जाहीर सत्कार केला. अमरावती विमानतळ हे आता अमरावतीसाठी एक गेमचेंजर म्हणुन बनणार असल्याचे व अमरावती मध्ये उद्योगाची भरभराट होणार असल्याचे यावेळी आ.रवि राणा व मा.खा.नवनित रवि राणा यांनी सांगितले. यावेळी हजारोच्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# अखेर अमरावतीकरांची प्रतीक्षा संपली, पहिल्या विमानाचे सुरक्षित लँडिंग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

गेल्या अनेक वर्षापासून बहुप्रत्यक्षित असलेले अमरावती विमानतळाचा लोकार्पण सोहळा आज झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार,एकनाथ शिंदे,केंद्रीय उड्डाण मंत्री कीजरापू राम मोहन नायडू यांच्या हस्ते हा लोकार्पण सोहळा पार पडला. आजपासून अमरावती ते मुंबई आणि मुंबई ते अमरावती विमानसेवेला सुरुवात झाली आहे. पहिल्याच दिवशी विमानाचे बुकिंग हाऊसफूल होते.

अमरावती विमानतळासोबतच आशिया खंडातील सर्वात मोठे एअर इंडियाचे वैमानिक प्रशिक्षण केंद्राचे देखील आज लोकार्पण होणार पार पडणार आहे, या विमानतळामुळे अमरावतीच्या विकासाला चालना मिळणार आहे. दरम्यान, ७२ आसनी विमान अमरावती ते मुंबई व मुंबई ते अमरावती असे आठवड्यातून तीन वेळा असेल. सोमवार, बुधवार व शुक्रवार असे तीन दिवस आठवड्यातून विमानसेवा




असेल.

**पहिल्या विमानाचे सुरक्षित लँडिंग**

१४ वर्षानंतर आज अखेर अमरावतीकरांचं स्वप्न पूर्ण झाले आहे. मुंबई वरून पहिलं विमान अमरावती विमानतळावर सुरक्षित लँड झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, नवनीत राणा यासह इतर मंत्र्यानी पहिल्या विमानाने प्रवास केला. अमरावती विमानतळावर विमान आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मंत्र्यांचं जोरदार स्वागत करण्यात आले. पहिलं विमान लँड झाल्यानंतर अमरावती विमानतळावर मोठा जल्लोष करण्यात आला.

**अमरावतीच्या नव्या विकासपर्वाला सुरुवात**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत अलायन्स एअर कंपनीच्या ९खइ३३ विमानाचे नवनिर्मित अमरावती विमानतळ येथे आगमन झाले. यावेळी अमरावती विमानतळावर आगमन झालेल्या पहिल्या प्रवासी विमानाला शानदार वॉटर कॅनन सलामी देण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री गिरीष महाजन आणि संबंधित अधिकारी तसेच इतर मान्यवर उपस्थित होते, असे ट्वीट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसयांनी केले आहे.

# एकनाथ शिंदेंचं पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपदावर भाष्य... म्हणाले.. पायलटची खुर्ची बदललीय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

आधीच्या सरकारमध्ये मी मुख्यमंत्री होतो, अजित पवार व देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री होते. आता फडणवीस मुख्यमंत्री, तर मी व अजित पवार उपमुख्यमंत्री आहोत. आमच्यात केवळ खुर्च्यांची अदलाबदल झाली आहे, असं वक्तव्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अनेकवेळा केलं आहे. यावरून एकनाथ शिंदेंच्या मनातून मुख्यमंत्रिपद काही जात नाही, अशा शब्दांत अजित पवार यांनी शिंदे यांची अनेकदा फिरकी घेतल्याचं देखील आपण पाहिलं आहे. अशातच आज पुन्हा एकदा शिंदे यांनी खुर्च्यांची अदलाबदल झाल्याचं वक्तव्य केलं आहे.

अमरावती विमानतळाच्या उद्घाटनप्रसंगी आयोजित कार्यक्रमात एकनाथ शिंदे म्हणाले, आमच्या आधीच्या सरकारच्या काळात अनेक प्रकल्प व योजना बंद होत्या. मात्र आम्ही (महायुती) सत्तेत आलो आणि राज्याच्या विकासाचं, कल्याणकारी योजनांचं टेकऑफ झालं. मी त्या विमानाचा पायलट



(वैमानिक) होतो. त्यावेळी देवेंद्र फडणवीस व अजित पवार हे माझे को-पायलट (सह-वैमानिक) होते. आता देवेंद्र फडणवीस आमचे पायलट आहेत. मी व अजित पवार को-पायलट आहोत. केवळ आमची खुर्ची बदलली आहे. मात्र, विकासाचं विमान तेच आहे, इंजिनही तेच आहे. आता ते अधिक गतीने धावताना दिसतंय.

**विमानतळ अमरावतीकरांसाठी गेमचेंजर ठरेल, एकनाथ शिंदेंना विश्वास**

ज्या भागात चांगली वाहतूक व्यवस्था असते, जिथे रेल्वे व विमानसेवा उपलब्ध असते तिथला विकास जलदगतीने होतो, असं म्हणत शिंदे यांनी कोल्हापूर विमानतळाचं उदाहरण दिलं. ते म्हणाले, राजाराम महाराजांनी स्थापन केलेल्या कोल्हापूर विमानतळाचा विस्तार आपण केला आहे. ते आता आंतरराष्ट्रीय दर्जाचं विमानतळ होत आहे.

शिंदे म्हणाले, अमरावती विदर्भातील शिक्षणाचं माहेरघर आहे. येथे विमानसेवा सुरू व्हावी अशी अमरावतीकरांची मागणी होती. ती मागणी आपण पूर्ण केली आहे. सध्या मर्यादित विमानफेऱ्या असल्या तरी जसजशी मागणी वाढेल तसतशी या विमानतळाची क्षमता व विमानफेऱ्या वाढवल्या जातील. हे विमानतळ अमरावतीकरांसाठी गेमचेंजर ठरणार आहे.

# अद्याप अमरावती विमानतळाचे नामकरण नाहीच....

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**

अमरावती विमानतळाच्या उद्घाटनप्रसंगी प्रदर्शित करण्यात आलेल्या दृकश्राव्य क्लिपमध्ये प्रज्ञाचक्षु संत गुलाबराव महाराज अमरावती विमानतळ असे नाव दर्शविण्यात आले होते. यासंदर्भात स्पष्ट करण्यात येते की, सदर नावाविषयी कोणताही अधिकृत निर्णय शासन स्तरावर अद्याप घेण्यात




आलेला नाही.

सदर नावाचा उल्लेख हा कार्यक्रम व्यवस्थापनासाठी नेमण्यात आलेल्या एजन्सीच्या निष्काळजीपणामुळे घडलेली चूक असून, दृश्य सादरीकरणामधील क्रिएटिव्हज आमच्या संमतीशिवाय व माहितीशिवाय तयार करण्यात आले व प्रदर्शित करण्यात आले.

तरी सदर बाब अनवधानाने घडलेली असून ती कोणत्याही प्रकारे शासनाच्या अधिकृत निर्णयाचे प्रतिनिधित्व करत नाही, हे नम्रपणे कळविण्यात येत आहे. सद्यस्थितीत संबंधित विमानतळास अमरावती विमानतळ या नावानेच संबोधित करण्यात येईल.सदर एजन्सीकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले असून, दोषी पक्षाविरुद्ध आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

# ‘एचएसआरपी’ला अमरावतीकरांचा अल्प प्रतिसाद आतापर्यंत केवळ ५ हजार ४८२ वाहनांवरच नंबर प्लेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

प्रादेशिक परिवहन विभागाच्या (आरटीओ) निर्देशानुसार २०१९ पुर्वीच्या जुन्या वाहनांना आधुनिक तंत्रज्ञानयुक्त उच्च सुरक्षा क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसवून घेण्यासाठी अमरावतीकरांचा अल्प प्रतिसाद असल्याचे समोर आले आहे. जिल्ह्यात एप्रिल २०१९ पुर्वी नोंदणी झालेली ७ लाखांवर वाहने असून आतापर्यंत केवळ ५ हजार ४८२ जुन्या वाहनधारकांनी वाहनांच्या जुन्या पाट्या बदलून, आधुनिक पाट्या बसविल्या आहेत. जिल्ह्यात आतापर्यंत एकूण १५ हजार ९२७ वाहनधारकांनी नंबर प्लेट बदलून घेण्यासाठी नोंदणी केली आहे, तर ९ हजार ७९५ वाहनधारकांनी अपॉइंटमेंट घेतली आहे.

वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये अदलाबदल व बनावटगिरीच्या गुन्ह्यांना आळा घालणे, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटवणे व राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने सर्व वाहनांना ‘एचएसआरपी’ बसवण्यासाठी केंद्रीय मोटर नियमाप्रमाणे बंधनकारक केले आहे. दरम्यान १ एप्रिल २०१९ पूर्वी ज्यांनी वाहन खरेदी केले, अशा सर्व वाहनांवर आता ‘एचएसआरपी’ प्लेट लावावी लागणार आहे. जिल्ह्यात एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेले ७ लाख ५२ हजार ६८५ वाहने आहेत. अमरावती शहर व जिल्ह्यात असे एकूण २७ केंद्र निश्चित केलेत. ‘एचएसआरपी’ बसवून घेण्यासाठी शहर व जिल्ह्यातील




वाहनचालकांना https://mhhsrp.com या पोर्टलवरून ऑनलाइन अपॉइंटमेंट घ्यावी लागणार आहे. त्यानंतर ठरवून दिलेल्या ठिकाणाहून ‘एचएसआरपी’ बसवून घ्यावी लागणार आहे.

केंद्रीय मोटार नियम १९८९ चे नियमानुसार सर्व वाहनांना ‘एचएसआरपी’ बसविणे बंधनकारक आहे. वाहन विक्रेत्याकडून १ एप्रिल २०१९ नंतर नोंदणी झालेल्या वाहनांना ही नंबर प्लेट बसविण्यात येत आहे. मात्र १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांना ही नंबर प्लेट सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार लावणे बंधनकारक केले आहे. अन्य राज्यात जीएसटी वगळून दुचाकीचे दर प्रतिवाहन ४२० ते ४८० रुपये, तीन चाकी वाहन ४५० ते ५५०, चार चाकी वाहन व जड वाहने ६९० ते ८०० रुपये आहेत. तर महाराष्ट्रात जीएसटी वगळून दुचाकी प्रतिवाहन ४५० रुपये, तीन चाकी ५००, चार चाकी व जड वाहने ७४५ रुपये असे दर आहेत.

जुन्या वाहनांना ही पाटी बसविण्याकरिता तीन उत्पादकांची परिवहन विभाग मार्फत निवड केली आहे. वाहन मालकांनी वाहनांवर ही पाटी बसविण्यासाठी परिवहन विभागाच्या संकेतस्थळावर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्याकरिता शुल्काचा भरणा ऑनलाईन पद्धतीने करावा. ही पाटी बसविण्याकरता वाहन मालकांनी वैयक्तिकरित्या होम फिटमेंट सर्विस या पर्यायाचा वापर केल्यास त्यांना अतिरिक्त शुल्काचा भरणा करावा लागणार आहे, असे सांगण्यात आले आहे.

# अमरावती विमानतळावर पहिलं विमान उतरलं, वॉटर सॅल्यूटनं झाले खास स्वागत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

अमरावती विमानतळावर आज अखेर पहिले बहुप्रतीक्षित व्यावसायिक विमान उरतले. सकाळी ११ वाजून २० मिनिटांनी अलायन्स एअरच्या ७२ आसनी विमानाने धावपट्टीवर लॅण्डिंग केले.

विमान उतरताच अग्निशमन दलाने पाण्याचे उंच फवारे मारून पहिल्या विमानाचे जोरदार स्वागत केले. त्यानंतर एअर इंडियाच्या विमान प्रशिक्षण संस्थेच्या (एफटीओ) विमानाने प्रात्यक्षिक उड्डाण घेतले. मुंबईहून अमरावती विमानतळावर पोहोचलेल्या या पहिल्या विमानातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह अनेक मान्यवरांनी प्रवास केला.मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अमरावती विमानतळाचे लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रमाला कार्यक्रमाला नागरी विमान वाहतूक मंत्री किंजारापू राम मोहन नायडू, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कामगार मंत्री आकाश फुंडकर आदी उपस्थित होते.मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अमरावतीत-मुंबई प्रवासासाठी प्रातिनिधिक स्वरूपात तीन प्रवाशांना बोर्डींग पास प्रदान करण्यात आले. नंतर ७२ प्रवाशांना घेऊन पहिले विमान मुंबईकडे झेपावले.

दरम्यान, या विमानतळा उद्घाटन सोहळ्यासोबतच दक्षिण आशियातील सर्वात मोठे पायलट प्रशिक्षण केंद्रही सुरु होणार असल्याची माहिती पुढे आली आहे. येत्या जुलै महिन्यापासून हे प्रशिक्षण केंद्र सुरु होणार आहे. यावेळी केंद्रीय वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री गिरीश महाजन, नवनीत राणा यांनी आज मुंबई ते अमरावती प्रवास केला.

# व्यावसायिकांना जमिनी विकू नका.., मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान निधी वाटपाचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

अनेक प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित कराव्या लागतात. मी मुख्यमंत्री असताना कायदा केला आहे, आता कुठलेही सरकार आले, तरी कमी पैशात भूसंपादन करता येणार नाही. शेतकऱ्यांना योग्य मोबदला द्यावाच लागेल. पण, एक गोष्ट आमच्या लक्षात आली आहे, की आम्ही जमीन अधिग्रहणाची घोषणा केली की, शेतकऱ्यांचे लक्ष



नसते आणि कुणीतरी धन्नासेठ येतो, शेतकऱ्यांकडून जमिनी विकत घेतो आणि तो त्याच जमिनीवर पाच पट जास्त पैसे कमावतो. तेही करमुक्त. त्यामुळे ज्या ठिकाणी भूसंपादन होणार आहे, त्या ठिकाणच्या जमिनी विकू नका. दोन पैसे जास्त मिळणार असेल, तर ते शेतकऱ्यांना मिळायला हवेत, व्यवसाय करणाऱ्यांना त्याचा लाभ मिळता कामा नये, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यानी बुधवारी येथे केली. येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात विदर्भातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान निधी वाटपाचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री म्हणाले, आमचे महायुतीचे सरकार आल्याबरोबर आम्ही प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न समजून घेतले. अनेक कायदेशीर अडचणी होत्या. प्रकल्पग्रस्तांना वाढीव मोबदला देणे शक्य नव्हते. डव्होकेट जनरल यांचेही मत जाणून घेतले. त्यांनीही नकार दर्शवला. पण, सरकारच्या मनात जरी असले, तरी निर्णय कायद्यानुसारच घ्यावा लागतो. अखेरीस मी ‘सीएजी’च्या प्रश्नांना उत्तर देण्याची तयारी दर्शवली, प्रकल्पग्रस्तांना सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेतला आणि ८३२ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले.

# राज्यातील सर्व शाळांची झाडाझडती होणार!,११ एप्रिल पासून राबवली जाणार तपासणी मोहिम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

शिक्षण हे प्रत्येक समाजाच्या प्रगतीचा पाया आहे, आणि हा पाया मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील सुविधांचा आढावा घेण्यासाठी ११ एप्रिल ते १५ मे २०२५ दरम्यान व्यापक तपासणी मोहीम राबवली जाणार आहे.या मोहिमेचा उद्देश शाळांमधील भौतिक आणि शैक्षणिक सुविधांचा तपशीलवार अभ्यास करून त्यातील त्रुटी दूर करणे आणि विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाचा अनुभव देणे आहे. प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांच्या नेतृत्वाखाली राबवली जाणारी ही मोहीम शाळांच्या प्रगतीसाठी कशी फायद्याची ठरेल हे जाणून घेऊया!प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना स्पष्ट निर्देश दिले आहेत की, जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका, नगरपरिषद आणि कटक मंडळांच्या शाळांची सखोल पडताळणी करावी.ही तपासणी ११ एप्रिल ते १५ मे २०२५ या कालावधीत पूर्ण करून त्याचा अहवाल प्राथमिक शिक्षण संचालनालयाला सादर करणे बंधनकारक आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश शाळांमधील मूलभूत सुविधांचा आढावा घेऊन त्यांना सुसज्ज आणि विद्यार्थी-केंद्रित बनवणे आहे.या तपासणी मोहिमेच्या यशस्वीतेसाठी राज्य सरकारने एक उच्चस्तरीय समिती गठित केली आहे. या समितीच्या अध्यक्षा मुंबई उच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश अनुजा प्रभुदेसाई आहेत. ही समिती शाळांमधील सुविधांचा नियमित आढावा घेते आणि त्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना देते.नुकत्याच झालेल्या बैठकीत समितीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील भौतिक सुविधांची तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत. या सूचनांनुसार, प्रत्येक जिल्हा



समितीने दरमहा किमान दोन शाळांना भेट देणे आवश्यक आहे, ज्यापैकी एक शाळा आदिवासी किंवा दुर्गम भागातील असावी.

**काय पाहणार समिती ?**

या मोहिमेदरम्यान शाळांमधील खालील बाबींची बारकाईने तपासणी केली जाईल शाळा इमारती,स्वच्छतागृहे,पाण्याची सुविधा,किचन शेड,शैक्षणिक साधने ज्या शाळांमध्ये या सुविधा अपुऱ्या असतील, त्यांचा विशेष समावेश करून सुधारणेसाठी शिफारशी केल्या जाणार आहेत.

**कोण करणार पडताळणी ?**

या मोहिमेत विविध स्तरांवरील अधिकारी सहभागी होणार आहेत त्यामध्ये केंद्रप्रमुख आणि विस्तार अधिकारी, सहायक प्रशासकीय अधिकारी, महापालिकांचे प्रशासकीय अधिकारी, नगरपालिकांचे गटशिक्षणाधिकारी, जिल्हास्तरीय समिती हे अधिकारी शाळांना भेटी देऊन सुविधांचा आढावा घेतील आणि त्यांचे निष्कर्ष विहित नमुन्यात अहवाल स्वरूपात सादर करतील. यामुळे तपासणी प्रक्रिया पारदर्शी आणि व्यवस्थित राहील.या मोहिमेची एक खास बाब म्हणजे आदिवासी आणि दुर्गम भागांतील शाळांना प्राधान्य देणे. या भागांतील शाळा अनेकदा मूलभूत सुविधांच्या अभावाने त्रस्त असतात. म्हणूनच, प्रत्येक जिल्हा समितीला अशा शाळांना भेट देण्याचे आणि त्यांच्या गरजा नोंदवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे ग्रामीण आणि मागास भागांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यास मदत होईल.तपासणी पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक जिल्ह्याने आपला अहवाल प्राथमिक शिक्षण संचालनालयाला सादर करावा, असे निर्देश आहेत. या अहवालांमध्ये शाळांमधील सुविधांच्या कमतरता, सुधारणेसाठीच्या शिफारशी आणि तातडीने आवश्यक असलेल्या उपाययोजना यांचा समावेश असेल. हे अहवाल पुढील धोरण ठरवण्यासाठी आणि निधी वाटपासाठी आधार ठरतील.